# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०३/०३/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०३/०३/२००५ रोजी सभा सुचना क्र. २५ दि. २५/०२/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ९) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १०) | श्री. मिलन गो. पाटील | सदस्य |
| ११) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १२) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| १३) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १४) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४८ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १४८ :-**

दि. ०७/१२/२००४, दि. १४/१२/२००४ व दि. १४/१२/२००४ (तहकुब) रोजीच्या मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १६१ :-**

वरीलप्रमाणे मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह दि. ०७/१२/२००४, दि. १४/१२/२००४ व दि. १४/१२/२००४ (तहकुब) रोजीच्या मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणेंत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.   अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४९ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतोय.  आपण सदर विषयामध्ये स्थानिक लोकांना वाव द्या.  हे जे बाहेरुन येतात आणि येथे काम करतात.  डॉक्टर फक्त त्यांच्याच माणसांना कामाला लावतो आणि आपण जर एखादे सांगितले तर ते करुन देत नाही.

**केशव घरत :-**

आपण स्थानिक लोकांना वाव द्यायला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

आपण स्थानिक लोकांना वाव द्यावा असा ठराव करु.

**मा. सभापती :-**

ह्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत आणि त्यांना प्राधान्य दिले आहे आणि प्रतिक्षा यादी दिली आहे. प्रतिक्षा यादीस शिफारस, ३९ लोकांस शिफारस म्हणजे हे एवढी माणसे दाखवली आहेत.  या ठरावामध्ये तुम्ही असे घ्या की, ह्यांच्या पुन्हा मुलाखाती तुम्ही घ्या आणि ह्याच्यामध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य दिले पाहिजे.  आपण जी प्रतिक्षा यादी ठेवलेली आहे त्याच्यात स्थानिक लोकांना प्राधान्य देता यावे म्हणून ही जी प्रतिक्षा यादी आहे ह्यांच्या पुन्हा मुलाखती घेऊन आपण तसे करुन घ्या.

**कैलासबेन जानी :-**

आपण ह्याची पेपरमध्ये जाहिरात देऊन नंतर मुलाखती घेतल्या पाहिजेत.

**मा. सभापती :-**

आपण हे पेपरमध्ये देऊनच केले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे सगळे लोक कुठचे आहेत?

**मा. सभापती :-**

जे मंजुरीसाठी आलेले आहे त्याला मंजुरी देऊन प्रतिक्षा यादीची.......

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ही जी प्रतिक्षा आहे ती पुन्हा मागवायची का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आपण पहिल्यांदा सांगा की, हे लोक कुठले आहेत?  कुठले, नगरपालिकेचे आहेत की, कुठले?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्याच्यामध्ये माझे असे मत आहे की, हे सर्व मुलाखती वगैरे झाल्या आहेत त्याच्यामुळे त्याला पुर्न-मुलाखत घेणे योग्य होणार नाही.

**मा. सभापती :-**

तसे नाही.  ह्यांची पुर्न-मुलाखत घ्यायची नाही.  तर प्रतिक्षा यादीमध्ये जे लोक आहेत, ह्यांची पुर्न-मुलाखत घेऊन स्थानिकांना प्राधान्य देण्यांत येईल असे करा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

असे आपल्याला कुठे म्हणता येणार नाही की, स्थानिकांना प्राधान्य द्या.

**मिलन पाटील :-**

स्थानिक लोक जातील कुठे?  प्रत्येक ठिकाणी स्थानिकांचे चालले आहे.  जिल्ह्यामध्ये ही स्थानिकांना प्राधान्य द्यायचे चालले आहे.

**कैलासबेन जानी :-**

ह्याच्यात स्थानिक किती आहेत?

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्याच्यामध्ये आपले नगरपालिकेचे लोक किती आहेत?

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक महानगरपालिकेमध्ये स्थानिक लोकांना वाव दिले जाते.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्याच्यामध्ये परत मुलाखती घेता येणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मग आम्ही हा ठराव नामंजुर करतो ना!

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य, जी प्रतिक्षा यादीवर नांवे दिलेली आहेत त्यांच्या पुन्हा मुलाखती घ्या आणि जी यादी आता आपण मंजुरीला दिली ती यादी आपण मंजुर करायची आणि जी प्रतिक्षा यादी आहे त्या प्रतिक्षा यादीमध्ये स्थानिक लोकांना भरती करण्याच्या दृष्टीकोनातून जी प्रतिक्षा यादी आपण दिली ती प्रतिक्षा यादी लावून नये आणि यासाठी पुन्हा निवड करा.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ह्याच्यामध्ये प्रतिक्षा यादीवर ठेवण्यास शिफारस. तर शिफारस करणारे कोण? ह्यांना घेणारे कोण? शिफारस म्हणजे आपल्या मिरा भाईंदर शिफारस करणारे कोण नाही का? प्रॉपर इथले. जसे श्रीम. नेहा निलेश वनमाळी, श्रीम. प्रियतमा हेमंत वाळगणकर ह्यांच्या शिफारशीनुसारच आपण डॉक्टर साहेब ह्यांना घेतले आहे का? ह्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत का? करार पद्धतीने प्रतिक्षा यादीवर ठेवण्यांस शिफारस. या लोकांनी शिफारस केल्यानंतर ह्यांना तुम्ही घेतलेले आहे का? त्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत?

**मा. सभापती :-**

आपण आता ज्या मुलाखती घेतल्या आहेत त्यांच्या नव्याने मुलाखती घेता येणार नाही. पण जी प्रतिक्षा यादीवर नांवे ठेवण्यांस शिफारस दिली आहे ह्यांच्या तुम्ही पुन्हा मुलाखती घ्या. कारण हे जे आहेत ह्यांच्या पुन्हा मुलाखती घेऊन स्थानिकांना प्राधान्य देण्याचे त्यात तुम्ही करा.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्याच्यापुढे महानगरपालिकेमध्ये भरती करतांना स्थायी समितीमध्ये विषय येऊ द्या.

**गजानन भोईर :-**

सभापती बोलतात की, ह्यांच्या परत मुलाखती घेण्यांत याव्यात. तर ह्याला अर्थच राहिला नाही.

**कैलासबेन जानी :-**

ह्यांच्यापैकी स्थानिक लोक किती आहेत?

**सुर्यकांत भोईर :-**

डॉक्टर साहेब, ह्यांच्यातले स्थानिक लेव्हलचे कोण आहेत ते तुम्ही सांगू शकता.

**प्रेमनाथ पाटील :-**

नावासहित सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

नावासहित आणि ॲड्रेससहित सांगा.

**डॉ. बावस्कर :-**

नांव आणि पत्त्याकरिता सर्वांचे अर्ज आणावे लागतील.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण ते अर्ज आणा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

भोईर साहेब, मी तुम्हांला सांगतो ह्याच्यामध्ये स्थानिक वगैरे असे काही वेगळे करता येणार नाही. ह्या मुलाखती घेतल्या आहेत. यादी तुमच्यासमोर आहे. ते तुम्हांला मान्य करावे लागेल.

**सुर्यकांत भोईर :-**

बरोबर आहे. मान्य करावे लागेल. हे आम्हांला पटतं. पण आपण जो ठेका पद्धतीने घेता त्यात कमीत कमी आपण स्थानिक लोकांना वाव द्या.

**केशव घरत :-**

साहेब, प्रोसिजर अशी आहे की, मुलाखती घेतल्यानंतर स्थायी समितीसमोर आणायचे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण ठरावदेखील असा केला होता.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

स्थानिक लोकांचे वेगळे करता येत नाही. स्थानिक लोकांना वाव द्या. म्हणजे स्थानिक लोकांना कसे काय वाव देणार? ज्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत त्यांना फायनल केले आहे.

**मिलन पाटील :-**

जिल्ह्यात देतात की नाही?

**रिटा शाह :-**

साहेब, स्थानिक लोकांनाच द्या असे नाही. पण प्राधान्य त्यांना द्या.

**मिलन पाटील :-**

आपण आम्हांला ह्या गोष्टी काय सांगता?

**सुर्यकांत भोईर :-**

पण ही लोक देतांना प्राधान्य कुठे देतात?

**मिलन पाटील :-**

साहेब, जिल्ह्यासाठी करतात की, नाही? मग आपण आपल्या गावासाठी का करु नये?

**सुर्यकांत भोईर :-**

आपली महानगरपालिका तर आपल्या महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्यांना नको का?

**गजानन भोईर :-**

उपायुक्त साहेब, मागे शिक्षकांवरही असेच झाले होते. ठाणे जिल्ह्यातील शिक्षकांनी कलेक्टरला पत्र देऊन मोर्चा देऊन नंतर तिथे ठाणे जिल्ह्याचे शिक्षक घेतले गेले. तसे ते सांगतात ते बरोबर आहे ना?

**सुर्यकांत भोईर :-**

भलतेच कोणतरी येऊन ते करुन घेतात.

**मा. सभापती :-**

आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रावर आपल्याला डॉक्टर्स, सिस्टर्स अशी विविध पदे भरायची आहेत. ह्या पदांकरिता आपण त्याची पेपरला जाहिरात देऊन निविदा मागविल्या होत्या आणि त्या निविदांद्वारे जे सदस्य आले, त्यांच्या आपण मुलाखती घेतल्या. मुलाखती घेऊन त्या आलेल्या मुलाखतींप्रमाणे या ठिकाणी आपण तसे दिलेले आहे. स्थानिकांची भरती म्हणजे जो महाराष्ट्रामध्ये पंधरा वर्षे राहतो त्याला आपण स्थानिकाची व्याख्या देतो. परंतु, मुलाखतीमध्ये जे सदस्य येतात त्यांच्यामध्ये जर तो मिरा भाईंदर परिसरामधला सभासद असेल, जो येणारा उमेदवार तर त्याला आपण प्राधान्य द्यायचे आहे. आता ह्याच्यामध्ये जे अर्ज आलेले आहेत ते तुमचे अर्ज मागवा की, हे कुठले आहेत त्याची आपल्याला कल्पना येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण संपुर्ण अर्ज मागवून घ्या आणि कुठले काय आहे ते आपण आम्हांला दाखवा. त्याच्यानंतर आम्ही मंजुरी देऊ. अन्यथा तोपर्यंत आम्ही मंजुरी देणार नाही.

**कैलासबेन जानी :-**

मिरा भाईंदर शहरातून कोणाचे ॲप्लीकेशन आले नाही का?

**डॉ. बावस्कर :-**

मिरा भाईंदर शहरातून डॉ. सिमा चव्हाण हे भाईंदर पश्चिमेतून आहेत. श्रीम. बेबी सु. पवार भाईंदरमधल्या आहेत. श्रीम. करुणा पागधरे ह्या आपल्या ऑफीसच्या पाठीमागेच राहतात. श्रीम. धनश्री मधुकर भोईर ह्या मुर्धाच्या स्थानिक आहेत.

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये स्थानिकांना घेतले आहेत?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण फक्त दोन ते तीन लोकांचे सांगितले. बाकीच्यांचे काय?

**डॉ. बावस्कर :-**

जेवढे मला माहिती आहे ते सांगतो. श्री. उमेश गुरव हेही भाईंदरमधले आहेत. श्री. योगेश शिंदे भाईंदरमधले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. संख्ये आहेत ते कुठले आहेत?

**डॉ. बावस्कर :-**

श्री. संख्ये हे वसईचे आहेत. पालघर वसईपर्यंत आहेत. आपण बाहेर कुठे गेलेलोच नाही आणि जे उमेदवार आपल्याला उपलब्ध होतात, जे उमेदवार मुलाखतीसाठी हजर राहतात त्यातूनच आपल्याला निवड करावी लागते. त्यातही जर आपण भाईंदरमध्ये राहणारे असले तर त्यांना आपण नक्कीच प्राधान्य देतो.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण आम्हांला जर सांगितले की, असे असे मुलाखती होणार आहेत तर आम्हीही लोकांना पाठवू शकतो ना? पेपर प्रत्येकजण वाचतो अशातला भाग नाही. तुम्ही कुठल्या पेपरमध्ये जाहिरात देता? तो पेपर आम्हांला माहित असतो का? अशा अशा मुलाखती होणार आहेत ते तुम्ही सांगा ना. तुम्ही कमीत कमी स्थायी समितीच्या सदस्यांना सांगा की, अशी अशी भरती आहे. तुमचे कोण मेम्बर असतील तर तुम्ही पाठवा. तुम्ही असे सांगू शकता की नाही? तुम्ही परस्पर करुन घेता.

**डॉ. बावस्कर :-**

परस्पर आम्ही करत नाही.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, ही महत्वाची गोष्ट आहे. स्थायी समितीच्या सभासदांची काय व्हॅल्यु आहे की नाही? त्यांना कुठल्याही गोष्टीमध्ये विश्वासात घ्यायचे नाही आणि असाच कारभार चालवायचा का? आम्हांला लोकांनी निवडून दिले. लोकांची आमच्याकडे अपेक्षा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्याच्यापुढे भरती करतांना स्थायी समितीमध्ये पहिले येऊ द्या. त्याच्यानंतर भरतीची प्रोसेस होऊ द्या.

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये आपण पेपरमध्ये जाहिरात दिलेली आहे.

**रिटा शाह :-**

जाहिरात दिली आहे हे तरी त्यांनी आम्हांला सांगायला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

पेपर दाखवा ना. कुठल्या पेपरला जाहिरात दिली?

**केशव घरत :-**

जर आपल्याला भरती करायची असेल तर स्थायी समितीची मंजुरी घेऊन नंतर मुलाखतीला बोलवा.

**हॅरल बोर्जीस :-**

दैनिक लोकमतमध्ये जाहिरात दिली होती आणि ती मी स्वतः वाचली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

सर्वजण तो पेपर घेतात का? आम्हांला हे माहित नव्हते. हे जेव्हा आमच्याकडे आज समोर आले तेव्हा आम्हांला माहिती झाले.

**डॉ. बावस्कर :-**

भोईर साहेब, आपल्या माहितीसाठी सांगतो. आपल्याला पुन्हा दोन-चार दिवसामध्ये जाहिरात द्यायची आहे. त्या जाहिरातीची कॉपी मी आपल्याला सर्वांना देतो.

**रिटा शाह :-**

तसे स्थायी समिती बरोबर को-ऑर्डीनेशन ठेवा. कुठल्याही विभागातून भरती करतांना आम्हांला विश्वासात घ्या.

**मा. सभापती :-**

प्रतिक्षा यादीमध्ये जी नांवे दिली आहेत त्याच्यात जे मिरा भाईंदर परिसरातील असतील त्यांना तुम्ही प्राधान्य द्या.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हे जे योगेश शिंदे आहेत त्यांना द्या.

**रिटा शाह :-**

भाईंदरचे जे आहेत त्यांना द्या.

**डॉ. बावस्कर :-**

असे त्यामध्ये करता येत नाही.

**मा. सभापती :-**

प्रतिक्षा यादीवर जी नांवे दिलेली आहेत ह्याच्यामध्ये स्थानिकांना प्राधान्य द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

स्थानिक म्हणजे मिरा भाईंदर मधले.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मी सभेत पाच मिनिटे उशिरा आली व प्रोसिडींग मंजुर झालेली आहे. त्यात माझे काही करेक्शन आहे. तर सभा संपल्यानंतर मी सचिवांकडे ते दुरुस्तीकरिता देईन.

**मा. सभापती :-**

ठिक आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

महानगरपालिका आरोग्य केंद्रासाठी करारपद्धतीने कर्मचारी वर्ग नियुक्त करणेबाबत जो ठराव आलेला आहे त्या ठरावाच्या अनुषंगाने प्रतिक्षा यादीवर ठेवण्यांस शिफारस करणारे जे उमेदवार आहेत त्याच्यामधुन मिरा भाईंदर परिसरातील स्थानिक लोकांना वाव देण्यांत यावा असा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १४९ :-**

महानगरपालिका आरोग्य केंद्रासाठी करार पद्धतीने कर्मचारी वर्ग नियुक्त करणे बाबत.

**ठराव क्र. १६२ :-**

मा. महानगरपालिका ठराव क्र. १९/४/२००३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य केंद्रे सुरु करण्यासाठी व त्यासाठी आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग करारपध्दतीने नेमण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

आरोग्य केंद्र सुरु होऊन जवळ जवळ एक वर्षाचा कालावधी होत आलेला आहे. आरोग्य केंद्रासाठी नेमणुक केलेल्या कर्मचा-यांपैकी

| | | |
|---|---|---|
| १) वैद्यकीय आरोग्य अधिकारी | - | २ |
| २) परिचारीका / एन.एम. | - | १ |
| ३) प्रसविका/ ए.एन.एम. | - | ५ |

ह्या कर्मचा-यांनी राजीनामे दिल्यामुळे वरील पदे रिक्त झालेली आहेत. तसेच एक फार्मासिस्ट तथा लिपिक गैरहजर असल्यामुळे आरोग्य केंद्राचे कामात अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे या पदावर नियुक्ती करणे गरजेचे आहे. या शिवाय दि. २०/१/२००५ चे महासभेत नविन आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे.

रिक्त पदावर नेमणुकीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांना थेट मुलाखतीसाठी दि. ३०/१२/२००४ रोजी बोलाविण्यात आले होते. जाहिरात देताना मागासवर्गीयांसाठी आरक्षण विचारात घेण्यात आले होते. मुलाखती खालील समितीकडून घेण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| मा. आयुक्त | - | अध्यक्ष |
| उप आयुक्त (श्री. अजिज शेख) | - | सदस्य |
| विशेष कार्य अधिकारी (आरोग्य) | - | सदस्य |
| मुख्य लेखा परिक्षक | - | सदस्य |
| मागासवर्गीय अधिकारी प्रतिनिधी | - | सदस्य |

मुलाखतीस उपस्थित असलेल्या उमेदवारांपैकी खालील उमेदवारांची नियुक्तीसाठी व प्रतिक्षा यादीवर ठेवण्यास शिफारस करण्यात येत आहे.

**१) वैद्यकीय अधिकारी पद संख्या - २ करार पध्दतीने एकुण वेतन रु. १०,०००/-**

**नेमणुकीस शिफारस केलेले उमेदवार**

१) डॉ. सिमा चव्हाण

२) डॉ. बालनाथ चकोर

**प्रतिक्षा यादीवर ठेवण्यास शिफारस**

१) डॉ. अरविंद काकडे

**२) परिचारीका / एन.एम पद संख्या - १ करारपध्दतीने एकुण वेतन रु. ४,५००/-**

**नेमणुकीस शिफारस केलेले उमेदवार**

१) श्रीमती प्रिया पंजाबराव पाटील

**प्रतिक्षा यादीवर ठेवण्यास शिफारस**

१) श्रीमती नेहा निलेश वनमाळी

२) श्रीमती प्रियतमा हेमेंत वालजंकर

३) श्रीमती सरोज शंकर पंदीरकर

३) **प्रसविका / ए.एन.एम. पद संख्या - ५ करारपध्दतीने एकुण वेतन रु. ३,०००/-**

| **नेमणुकीस शिफारस केलेले उमेदवार** | **प्रतिक्षा यादीवर ठेवण्यास शिफारस** |
|---|---|
| १) श्रीमती उर्मिला रामू घेगड | १) श्रीमती शोभा शं. घोणे |
| २) श्रीमती बेबी सु. पवार | २) श्रीमती तारामती वै. साखरे |
| ३) श्रीमती आरती अ. गुरव | ३) श्रीमती संचीता तमाचीकर |
| ४) श्रीमती सुनिता बा. मोठे | ४) श्रीमती रुचिता र. संखे |
| ५) श्रीमती करुणा पागधरे | ५) श्रीमती निर्मला ज. संखे |

४) **फार्मासिस्ट तथा लिपिक पद संख्या - १ करारपध्दतीने एकुण वेतन रु. ३,५००/-**

| **नेमणुकीस शिफारस केलेले उमेदवार** | **प्रतिक्षा यादीवर ठेवण्यास शिफारस** |
|---|---|
| १) श्रीमती धनश्री मधुकर भोईर | १) श्री. उमेश बबन गुरव |
| | २) श्री. योगेश चिंतामण शिंदे |

तरी महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रावरील रिक्त पदावर वरील प्रमाणे शिफारस केलेल्या उमेदवारांचे करारपध्दतीने सहा महिन्याचे कालावधी करीता ते हजर होतील त्या तारखेपासून नेमणुकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नेमणुकीस ही समिती मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर. अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५० चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या श्रीम. रिटा शाह ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १५० :-**

शैक्षणिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ यावरील जकात माफीबाबत.

**ठराव क्र. १६३ :-**

महाराष्ट्र राज्य हे देशातील शैक्षणिक दृष्टीने एक प्रगत आणि पुरोगामी राज्य असून राज्यातील शैक्षणिक वाढ गतीने होण्याच्या दृष्टीने विविध शैक्षणिक बाबींना वेळोवेळी प्रोत्साहीत करण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे.

राज्यातील शालेय व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर शैक्षणिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ यावर जकात आकारणी केल्याने उच्च शिक्षण विषयक पुस्ताकांच्या तसेच संदर्भ ग्रंथांच्या किंमतीत वाढ होवून त्याचा आर्थिक भार शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर पडतो. सदर संदर्भात महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण १०२००४/प्र.क्र./१६८/नवि २०, मंत्रालय मुंबई ४०००३२ दि. ३/१२/२००४ ने परिपत्रक काढून महानगरपालिकेमार्फत शालेय उच्च शिक्षण संबंधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावर आकारण्यात येणारा जकात कर माफ करावा. व त्या दृष्टीने पुढील कार्यवाही महानगरपालिकेने त्वरीत करावी असे निर्देश दिलेले आहेत. वरील वस्तुस्थितीचा विचार करुन शासनाचे शैक्षणिक बाबींना वेळोवेळी प्रोत्साहीत करण्याचे शासनाचे धोरण विचारात घेता. शैक्षणिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ मालावर संपूर्णपणे जकात माफी ही सभा देत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह. अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५१ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

सभापती साहेबांनी ठरावाच्या अंमलबजावणीचा जो विषय घेतला आहे. पहिल्यांदा असा विषय स्थायी समितीपुढे आला आहे की, पारदर्शकता काय असते हे आपल्याला आज सभेसमोर समज येते. कारण सभापती साहेबांनी महत्वाचे विषय घेतले आहेत. जसे आपण काशीमिरा रोडचा सर्व्हे केला. आरोग्य विषयी जो गुप्त अहवाल होता, संत गाडगेबाबा अभियानाद्वारे तेही आपल्यासमोर आणले होते आणि आपण केलेले जेवढे ठराव आणि त्याचे इम्प्लिमेंन्टेशन काय झाले, ते आपण नेहमी विचारत असतो आणि त्यांनी तसा विषय विषयपटलावर आणला आहे. त्याबद्दल मी सभापती साहेबांना माझे स्वतःचे आणि स्थायी समितीच्या सर्व सभासदांच्या वतीने अभिनंदन करत आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय आपण आणल्यामुळे या विषयाचा गोषवारा येत नाही. मी सचिव साहेबांना सांगितले की, पाच मिनिटामध्ये ज्या कॉप्या, ठराववाईज दिले दिनांक, प्रकरण क्रमांक, विषय आणि विभाग, मंजुर किंवा नामंजुर, ठराव क्रमांक आणि केलेली कार्यवाही यांच्या प्रती आपल्याकडे पाच मिनिटामध्ये येतील. तर तत्पुर्वी माझे असे म्हणणे आहे, आपला जो मागचा विषय आहे, प्रकरण क्र. १५२ सुरु करु आणि १५१ ची प्रत आल्यानंतर आपण चर्चा करुन घेऊ. तसेच, सचिवजी, उपायुक्त साहेब यासाठी आपले जेवढे संबंधित अधिकारी आहेत त्यांनाही बोलवावे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आपण गेल्या सभेत सांगितले होते की, जो काशीमिरा रोड आहे त्याचा विषय पुढच्या सभेत घेणार. पण तो घेतला नाही.

**मा. सभापती :-**

आपण जे ठरावाच्या अंमलबजावणीचा विषय घेत आहोत त्याच्यात ते येईल.

**गजानन भोईर :-**

त्याची कॉपी आपल्याकडे येत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

कॉपी येत आहे. पण आपण आता तो विषय ठरावाचे करत आहोत.

**मा. सभापती :-**

काय कार्यवाही घेतली आहे ते ह्याच्यामध्ये येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तुम्ही ठराव मागितले आहेत. पण तो विषयच आपण घेतला नाही.

**मा. सभापती :-**

ही माहिती म्हणजे, आपण सभेमध्ये जे ठराव घेतले त्यांची अंमलबजावणी काय झाली? कार्यवाही काय झाली? ह्याची चर्चा करण्यासाठी आपण ते मागवले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण जी पाहणी करायला गेलो होतो त्याचे ते ठरावाचे.

**मा. सभापती :-**

तो विषय पुन्हा येईल.

**गजानन भोईर :-**

आपण त्याच्यावर पाच मिनिटानंतर चर्चा करायची आहे.

**मा. सभापती :-**

सचिवजी तोपर्यंत आपण पुढचा विषय घ्या.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५२ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

जे रिपेअरिंगला दिले होते ते आले का? त्याची पोझीशन काय आहे?

**गजानन भोईर :-**

ते आपले मागच्या सभेत झाले होते ना.

**मिलन पाटील :-**

ते आपण रिपेअरिंगला दिले होते. त्या रिपेअरिंगला सभेत मान्यताही दिली आहे.

**गजानन भोईर :-**

जुन्या जे.सी.बी.चे काय झाले? रिपेअर करुन मागवली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

जुनी जे.सी.बी. कुठे आहे? काय आहे? ते दाखवा. किती खर्च केला? काय केला? तो दाखवा.

**मिलन पाटील :-**

डॉक्टर साहेब, जुनी जे.सी.बी. आणली का?

**सुर्यकांत भोईर :-**

जे.सी.बी. हे आरोग्य विभागाशी संबंधित आहे. मग तुम्ही वाहन विभागाचे सांगता.

**डॉ. बावस्कर :-**

जे.सी.बी. जरी आम्ही वापरत असलो तरी ते वाहन विभागाच्या ताब्यात असते आणि माझ्या माहितीनुसार तो जे.सी.बी. तयार झालेला आहे. चेक द्यायचा वगेरे राहीला होता. जे.सी.बी. रिपेअर झाला होता.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आणलेला नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपल्याला पाच मिनिटात माहिती मिळेल. तो जे.सी.बी. आणला का नाही आणला?

**मिलन पाटील :-**

आपल्याला दोन मिटींग डॉक्टर साहेब झाल्या आणि अजुन महानगरपालिकेकडे पैसे नाहीत. बेलवटे साहेब, आपण जे.सी.बी.चा चेक दिला नाही का?

**शरद बेलवटे :-**

जे.सी.बी.चा विषय अजुन आमच्याकडे आलेला नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सभापती साहेब, माझी अशी विनंती आहे की, जे कोणी कार्यकारी अधिकारी, जर उद्याला जे.सी.बी. आली नाही तर त्याला डिसमिस करा असे सर्व सभासदांच्या वतीने सांगु इच्छितो. मला माहिती मिळाली की, डॉक्टर साहेब बोलले की, ती जे.सी.बी. आली. एक महीना अगोदर आम्ही विषय काढला. एका वर्षापासून तिच स्थिती आहे. नविन जे.सी.बी. आणायची जरुरत काय?

**मिलन पाटील :-**

बेलवटे साहेब, तुमच्याकडे पैसे नाहीत का? की, काय आहे?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

त्यांच्याकडे तो विषय आलाच नाही. दिड वर्षापासून ती मशिन तिथे सडत आहे आणि नविन मशिन घ्यायचा विषय आणता.

**सुर्यकांत भोईर :-**

नविन मशिन घ्यायचीच नाही. बेलवटे साहेबांकडे काय आले का?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आजच्या आज चेक गेला पाहिजे. अन्यथा उद्याच्या उद्या त्याला काढून टाका. एक एक, दोन दोन वर्ष बघत नाही आणि भाड्याने मशिन वापरतात. आपल्याकडे पैसे जास्त झाले आहेत का?

**मा. सभापती :-**

मध्यंतरी मी चर्चा केली. आपण साडेपाच लाख रुपये खर्च केला आहे. जे.सी.बी.ला नविन कंपनीमध्ये.......

**सुर्यकांत भोईर :-**

हेमंत पाटील, जे.सी.बी.ची रिपेअरिंग झालेली आहे. ती जे.सी.बी. रिपेअरिंग झाली का?

**हेमंत पाटील :-**

जे.सी.बी. रिपेअरिंग झालेली आहे आणि लेखा विभागाकडे चेक काढायला बिल सादर केलेले आहे.

**शरद बेलवटे :-**

हे चुकीची माहिती देत आहेत

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आम्ही त्यांना आत्ताच विचारले आहे. त्यांच्याकडे चेक गेलेला नाही.

**हेमंत पाटील :-**

इंजिनिअरकडे चेक दिलेला आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

इंजिनिअरला बोलावून घ्या. दिड महिन्यापासून मी ह्या गोष्टीवर चर्चा करत आहे.

**गजानन भोईर :-**

मागच्या वेळी पाच दिवसात येईल असे सांगितले होते.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मागे बजेटच्या वेळी आणली नसेल आणि जे.सी.बी. आणली नसेल.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, आपल्याला चुकीची माहितीही देतात.

**मा. सभापती :-**

हेमंत पाटील माहिती काय आहे? आपण जो मोठा जे.सी.बी. रिपेअरिंगला दिला त्याची माहिती काय?

**हेमंत पाटील :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, जे.सी.बी.चे देयक आपल्याला प्राप्त झाले होते आणि त्याच्यामध्ये त्यांनी आपल्याला जे काही रिपेअरिंग सुचविले होते, त्यानुसार त्याची रितसर हिस्ट्री बुकला नोंद घेऊन त्याचे देयक तयार करुन मी माझ्या इंजिनिअरकडे दिले होते आणि त्याच्यानुसार त्यांनी ते लेखा विभागाला सादर केलेले आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

**मिलन पाटील :-**

ते इंजिनिअर कोण?

**हेमंत पाटील :-**

श्री. उमेश अवचर.

**मिलन पाटील :-**

तुम्ही चुकीची माहिती देऊ नका. चुकीची माहिती दिली तर तुमच्यावर कार्यवाही करण्यांत येईल हे लक्षात ठेवा. हेमंत पाटील खुप झाले. हे काम वर्षभर चालू आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही वाहन विभाग सांभाळता तर तुम्हांला गाड्या रिपेअर करता येत नाही का? तुम्हांला ह्याचा पाठपुरावा करता येत नाही का? तुम्ही पाठपुरावा केला पाहिजे. आज तुम्ही भाड्याने गाड्या चालवतात आणि आपल्या गाड्या रस्त्यावर सडत असतात. त्यांना टायर्स नसतात, काही नसते. त्याची तुम्ही देखरेख करत नाही का?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण गाड्या भाड्याने कशासाठी वापरतो? रिपेअर करायला एक वर्ष लागते की, किती वर्ष लागते? तुमचे ह्याच्यावर लक्षच नाही. आपण गाड्या भाड्याने आणायला पैसे द्या.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब, जेव्हा स्थायी समितीची आपली सभा असते त्यावेळेला संबंधित विषयाचे अधिकारी उपस्थित असायला पाहिजे. त्यांनी अगोदर आपल्याशी चर्चा करायला पाहिजे. सचिवांशी चर्चा करायला पाहिजे. सभापतींबरोबर चर्चा करुन घ्यायला पाहिजे. कारण आम्ही दर वेळेला ब्रिफिंग करतो. ह्या वेळेला मी माझ्या वेळेप्रमाणे दहा वाजता आलो होतो. पुर्वी दहा वाजता आल्यानंतर सर्व संबंधित अधिकारी येतात व त्या विषयाची ब्रिफिंग होते आणि जर तुम्हांला विषयाची ब्रिफिंग करण्याची काळजी जर ह्या अधिका-यांना नसेल तर ज्या पद्धतीच्या भावना सदस्यांच्या आहेत त्या भावनेचा विचार केला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, हे अधिकारी तुम्हांलाही विचारत नाही आणि उपायुक्तांनाही विचारत नाही. हे अधिकारी आपले शेठ बनतात.

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, स्थायी समितीची सभा चालू होण्याअगोदर जे विषय असतील त्याचे संबंधित अधिकारी येथे आम्हांला स्थायी समितीत हजर पाहिजे. तुम्ही त्यांना स्ट्रीक्टली वॉर्निंग द्या, लेखी स्वरुपामध्ये. ह्यावेळेला ह्या सभेत आम्ही मान्यता देतो पण पुढच्या वेळेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

पुढच्या वेळेला जो कोणी उशिरा येईल त्याची हयगय केली जाणार नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

मिलन पाटील साहेब, मी तुमच्या मताशी सहमत आहे. ॲक्च्युअल आमची चुकी आहे. मी असे पुढच्या वेळेस होऊ देणार नाही. आपण विचारलेल्या प्रश्नाबद्दल मी आपल्याला ॲडीशनल माहिती देतो. हा विषय मला माहिती होता पण कागद हरवले का नाही हे मला माहिती नव्हते. साहेब, ह्याच्यामध्ये सही होऊन दिड महिना झाला.

**मिलन पाटील :-**

कोणाची सही?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

सगळ्यांची सही झाली आहे. परंतु, हे अजुन लेखा विभागाकडे गेलेले नाही. ह्याच्यामध्ये काय अडचणी आहेत, माहित नाही. पण दिड महिना म्हणजे ॲक्च्युअल कुठलेही प्रकरण तपासायला मला वाटते की, आठवड्यापेक्षा जास्त दिवस लागण्याची आवश्यकता नाही. ह्याच्यात काय अडचण आहे? त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सभापती साहेबांनी या ठिकाणी बोलावले आहे. त्यामुळे आत्ताच्या आत्ता येथेच निर्णय होईल की, काय कुठल्या प्रकारची अडचण आहे?

**मिलन पाटील :-**

दिड महिना का लागला?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

मी तुम्हांला माहिती देतो. ह्याच्यामध्ये जे.सी.बी.चे प्रकरण पाटील साहेब, आपण मागच्या वेळी स्थायी समितीमध्ये चर्चा केली होती. त्यानंतर सात-आठ दिवसामध्ये प्रकरण तयार झाले. अभियंत्यांची शिफारस आहे. वाहन विभागाचे अधिकारी, उपायुक्तांचीही शिफारस असून प्रस्ताव झालेला आहे. परंतु, संबंधित माणूस लार्सन ॲण्ड ट्युब्रोच्या गॅरेजमध्ये जाऊन आपला जे.सी.बी. तेथे तयार आहे ह्याची समक्ष खात्री करुन आलेला आहे. ह्याच्यामध्ये पाच लाख अठ्ठ्यान्नव हजार आठशे बेचाळीस रुपयाचे बिल तयार आहे. त्याचे पुढे नेमके काय झाले, ह्याची आपल्याला माहिती घेणे आवश्यक आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

पाच लाख अठ्ठ्यान्नव हजार रुपयामध्ये तुम्ही काय काय रिपेअरिंग केलेले आहे ते सांगू शकता का? आयटम वाईज सांगा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

लार्सन ॲण्ड ट्युब्रो या कंपनीकडून काम तयार करुन घ्यायचे चालू होते व वाहन विभागाचे प्रमुख म्हणून त्या ठिकाणी त्यांनी समक्ष भेट दिली.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण आम्हांला लार्सन ॲण्ड ट्युब्रोचे बिल दाखवता का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

ते बिल ह्याच्यामध्ये आहे.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यात जे पार्ट टाकले आहेत, ते पार्ट टाकल्यानंतर जे पार्ट निकामी होते ते पार्ट रिटर्न आणायचे. त्याच्यावर जॉब नंबर असतो. त्या जॉब नंबरची गॅरंटी असते. म्हणजे वॉरंटी पिरियड असतो आणि तो जॉब नंबर त्याला लागलेला असतो आणि त्याचा रेकॉर्ड असतो हे आपण लक्षात ठेवा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

ह्याच्यामध्ये आपण जे काम केले आहे त्याची माहिती आपल्याला सांगतील. पार्टबद्दलचे जे काही गॅरेंटी पिरिएड आहे, रिप्लेस करण्याचे ते सांगतो.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, आपण आम्हांला त्याची झेरॉक्स द्या.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

ठिक आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, झेरॉक्सचा प्रश्न येतो तर ते सभा संपल्यानंतर देणार आणि त्यानंतर आम्ही ते मागितले तर आम्हांला चपला घासाव्या लागतात. तरीही आम्हांला ती प्रत मिळत नाही. ह्या विभागातून त्या विभागात आणि त्या विभागातून ह्या विभागात फेऱ्या मारायला लागतात.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आम्हांला झेरॉक्स नको आहे. आपण त्यांना विचारा की, कधी येथे जे.सी.बी. येणार?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आपले बिल ऑलरेडी तयार आहे आणि त्याला फक्त पैसे दिल्यानंतर आपल्याला प्रत्यक्षात चेक हॅन्ड-ओव्हर करायचा आहे आणि जे.सी.बी. घेऊन यायचा आहे. एवढीच प्रक्रिया बाकी आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, किती महिने झाले जे.सी.बी. रिपेअरिंगला टाकून ते आपण आम्हांला सांगू शकता का?

**गजानन भोईर :-**

जे.सी.बी. तयार आहे, असे आपली जी शेवटी सभा झाली त्यावेळी चर्चा झाली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही सांगु शकता का, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या गाड्या किती आहेत? किती गाड्या धूळ खात पडल्या आहेत आणि किती गाड्या रिपेअरिंग करायच्या आहेत ते आपण सांगू शकत का?

**मा. सभापती :-**

सदर विषय गाड्यांचा नाही. याबाबत आपण नंतर चर्चा करा.

**प्रभात पाटील :-**

सदर विषय गाड्यांचा नाही असे म्हणता येणार नाही. आपण असे म्हणून नये.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्या किती गाड्या धूळ खात पडल्या आहेत?

**मा. सभापती :-**

आधी विषयपत्रिकेवरील विषय होऊ द्या. नंतर आपण ह्या विषयावर बोला. आपल्याला वेळ देतो ना.

**सुर्यकांत भोईर :-**

इंजिनिअर कुठे गेले? आपण त्यांनाफोन करुन बोलवा.

**मा. सभापती :-**

हे जे प्रकरण आहे त्याच्यावर १५/०१/२००५ रोजी उपायुक्त श्री. अशोककुमार रणखांब साहेब ह्यांनी सही करुन फायनल दिले आहे. उपरोक्त अहवालाप्रमाणे कनिष्ठ अभियंता सोबत प्रत्यक्ष पाहणी केली असता अभियंत्यांनी तपासून वाहन दुरुस्त केल्याबद्दल शिफारस केलेली आहे. सबब देयक अदा करणेबाबतच्या कार्यवाही करता सादर. म्हणजे आपल्याकडून लेखा विभागाकडे गेले आहे.

**श्री. डांगरे :-**

लार्सन ॲण्ड ट्युब्रोचे जे बिल आहे ते ऑडीट सेक्शनला १७/०२/२००५ ला आम्हांला प्राप्त झाले आहे. परंतु, हे जेव्हा कुठल्याही वाहनाच्या रिपेअरचे देयक द्यायचे असते ते हिस्ट्री बुकमध्ये टाकणे आवश्यक असते. त्यांनी हे देयक हिस्ट्री बुकमधून न टाकल्याने आम्ही ते सर्व हिस्ट्री बुकमध्ये एंन्ट्री घेऊन नंतर आमच्याकडे सादर करण्यासाठी आम्ही त्यांना हॅन्ड-ओव्हर केले होते. त्यानंतर ते तेथून आम्हांला हे आज दिसत आहे.

**मिलन पाटील / सुर्यकांत भोईर :-**

ही प्रोसिजर त्यांना माहिती नाही का?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ही चुकीची पद्धत आहे.

**श्री. डांगरे :-**

साहेब, वाहनांचे कुठलेही देयक हिस्ट्री बुकमधून येते.

**सुर्यकांत भोईर :-**

वाहन विभाग त्यांच्याकडे आहे त्यांना ही प्रोसिजर माहिती नाही का?

**श्री. डांगरे :-**

माहित असायला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्हांला प्रोसिजर माहिती नाही का?

**हेमंत पाटील :-**

सदरची कार्यवाही करुन ते इंजिनिअरकडे बिल दिले होते.

**मिलन पाटील :-**

हे काम इंजिनिअरचे नाही. अधिकारी तुम्ही आहात.

**सुर्यकांत भोईर :-**

इंजिनिअर तुमच्यापेक्षा मोठा का?

**हेमंत पाटील :-**

ते बिल खतवण्यासाठी मी इंजिनिअरकडे दिले होते.

**केशव घरत :-**

हेमंत पाटील, तुम्ही एक जबाबदार व्यक्ती आहात. इंजिनिअरने काम केले की नाही केले ह्याचा पाठपुरावा करण्याचे तुमचे काम आहे. ते अजुनपर्यंत का झाले नाही हे तुम्ही इंजिनिअरला विचारले नाही. आज दिड-दोन महिने त्या गोष्टीला झाले.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण ती मशिन रिपेअरिंग करायला कधी दिली होती?

**केशव घरत :-**

दिड वर्ष झाले.

**सुर्यकांत भोईर :-**

दिड वर्षामध्ये ती मशिन रिपेअरिंग झाली नाही?

**गजानन भोईर :-**

आपण नुसता वेळ वाया घालवू नका. माहिती असेल तर सरळ सांगा नाहीतर आम्हांला ह्याची कल्पना नाही असे सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

पण पुढच्या सभेला का, संपुर्ण तयारी करुन यायला.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, आपण हा विषय पुढच्या सभेत घ्या.

**गजानन भोईर :-**

थातुरमातुर उत्तर देऊन विषय पुढे न्यायचा असेल तर आत्ता घेऊच नका. पुढच्या सभेतच घ्या.

**रिटा शाह :-**

मेन मुद्दा असा आहे की, आपल्याला पोकलन आणि जे.सी.बी. घ्यायचा आहे. आपण मागच्या बजेटमध्ये ह्याचे बजेट मंजुर करुन घेतले आहे आणि आपण घेतले नाही तर ते पैसे लॅप्स होतील. तर महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, ते जे.सी.बी. रिपेअरिंगला गेले त्याला किती कालावधी झाला? आणि त्याच्यामध्ये किती रिपेअरिंग झाले? किती स्पेअरपार्ट राहिले? किती स्पेअरपार्ट टाकलेले आहेत? आतण त्याचा गॅरंटी पिरिएड किती? महत्वाचा विषय असा आहे की, आपल्याला जे.सी.बी. आणि पोकलन मशिन घ्यायचे आहे आणि ते आपल्याला नक्कीच घ्यावे लागेल. कारण आपण नालेसफाईसाठी वेळोवेळी बोलतो. नालेसफाई आपण खाजगी ठेकेदाराकडून करुन घेतो. मग आपले स्वतःचे जे.सी.बी. आणि पोकलन असेल तर आपले साठ लाख रुपये वाचतील. मला असे वाटते की, आपण जो महत्त्वाचा मुद्दा आमच्याकडे आणलेला आहे तो विषय तुम्ही पास करा. तसा मी ठरावही मांडत आहे की, पोकलन आणि जे.सी.बी. मागवून घ्या. परंतु, जो विषय सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर, मिलन पाटील आणि मॉरस रॉड्रीक्स साहेबांनी जो मुद्दा उचलला आहे की, आपल्याकडे जी जे.सी.बी. आहे आणि ते रिपेअरिंगला केव्हा गेले? त्याचा कालावधी किती झाला? आणि त्याच्यामध्ये रिपेअरिंग किती केले? त्याच्यात किती स्पेअरपार्टस् टाकले आणि किती काढून घेतले? आणि किती तुम्ही ताब्यात घेतले आणि किती खर्च झाला? त्याचा संपुर्ण आढावा आपण पुढच्या सभेत द्यावा या शर्तीवर आपण जे.सी.बी. आणि पोकलन मागवून घ्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपल्याला ठरावाची जरुरत आहे का? आपला जे.सी.बी. दिड वर्षानंतर येणार नाही. तर नविन जे.सी.बी. घ्यायची जरुरत आहे का?

**मा. सभापती :-**

आपले जे.सी.बी. किती आहेत?

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, आपण साठ लाख रुपये खर्च करुन आपण नविन जे.सी.बी. आणतो पण त्याला किती वर्षाची गॅरेंटी मिळणार?

**हेमंत पाटील :-**

एक जे.सी.बी. आहे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, जर जे.सी.बी. घ्यायचा असेल तर कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने घ्या, गटार साफ करायला.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, ही जी नविन जे.सी.बी. आणि पोकलन मशीन घ्यायची आहे ती आपल्याला कशाकरिता घ्यायची आहे?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

डॉक्टर साहेब, आपल्याला नविन जे.सी.बी. घेणे जरुरीचे आहे का?

**मा. सभापती :-**

विषय असा आहे की, आपल्या मागच्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये आपल्याकडे साठ लाखाची तरतुद आहे. जुनी जे.सी.बी. घेण्याबाबत आणि नाले सफाईमध्ये आपण दरवर्षी साठ लाख रुपये खर्च करतो. त्या संदर्भामध्ये साफसफाई करतांना त्याचे असमाधानकारक रिपोर्टची आपल्यासमोर माहिती आलेली आहे आणि एकदा साफ केल्यानंतर पुन्हा ते नाले साफ होत नाही आणि साठ लाख रुपये हा खर्च आपल्याला दरवर्षी लागू होतो. ह्याच्यामध्ये जो जे.सी.बी. आपण लार्सन ॲण्ड ट्युब्रोचा आहे त्या लार्सन ॲण्ड ट्युब्रोच्या जे.सी.बी.चे आपण रिपेअरींग करुन आणल्यानंतर त्याला सहा लाख रुपये आपण खर्च केला तर तो एकदम व्यवस्थितरित्या आपल्याकडे येणार आहे आणि पन्नास लाखाची आपल्याकडे तरतुद आहे. त्याच्यामध्ये आपण दोन जे.सी.बी. किंवा डोझर आणला तर आपल्याकडे जर ह्या तीन मशिनरी आल्या तर आपण एका वर्षामध्ये साठ लाख रुपये खर्च केला तर ह्या तिन्ही मशिन तुमच्या घरामध्ये फुकट पडतील आणि तुम्हांला वर्षभर साफसफाई करता येईल. दुसरा विषय असा आहे की, ह्याच्यामध्ये ही जी रिपेअरिंग आहे त्याच्यात वाहन विभागाचे काम बोगस काम आहे आणि वाहन विभागामध्ये पाठपुरावा न झाल्या कारणाने श्री. नाकाडी साहेबांकडून जो रिपोर्ट यायला पाहिजे तो रिपोर्ट आला नाही. त्याची येथे चर्चा होणे फार जरुरी आहे. जर एखाद्या खात्याने बिल पाठवले तर ते बिल का येत नाही हा नंतरचा विषय आहे. आपण जे तीन जे.सी.बी. घेतोय त्यात लार्सन ॲण्ड ट्युब्रोची आहे, टाटा कंपनीची आहे. तर ह्या दोन्ही कंपनीकडे आपल्याकडे वाहन विभागामध्ये जे ड्रायव्हर आहेत त्यांना आपण प्रशिक्षणाला पाठवणे फार जरुरी आहे. जर आपण फक्त एक जे.सी.बी.कडे दोन जर प्रशिक्षणाला ड्रायव्हर पाठवले, टाटा आणि लार्सन ॲण्ड ट्युब्रो कंपनीकडे. त्यानी ते जर तीन महिने, चार महिने, सहा महिन्याचे प्रशिक्षण घेऊन आले तर त्यांची रिपेअरिंग दुरुस्ती आणि जी माहिती पाहिजे ती पुर्णपणे त्या ड्रायव्हरला माहिती पडेल आणि जे रिपेअरिंगला सामोरे जावे लागते त्यांना सामोरे जावे लागणार नाही. अशा पद्धतीने ते काम होईल आणि पुढे आपल्याला तो त्रास होणार नाही. मग असलेली रक्कम जी आपल्याकडे आहे ही रक्कम जर आपण लॅप्स केली तर आपली रक्कम लॅप्स होते.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

लॅप्स करण्यापेक्षा आपण ती रक्कम दुसऱ्या हेडमध्ये वळवून घेऊ.

**मा. सभापती :-**

आता वळवता येणार नाही. ती रक्कम आता लॅप्स होईल. कारण आता वळवता येणार नाही. आपण ती वळवलेली आहे. जेव्हा सुधारित अंदाजपत्रकाचे आले होते त्यावेळेला आपण ती पन्नास लाख रुपये अपेक्षित ठेवली होती. तर आता हे पन्नास लाख रुपये लॅप्स होतील. परंतु, जर एका वर्षाकरिता दरवर्षाला तुम्ही साठ लाख रुपये खर्च करता आणि त्याच्यावर एकदम गरमागरम चर्चा मागच्या वेळी ह्याच सभागृहामध्ये झाली की, कोणत्याही पद्धतीने समाधानकारक काम झाले नाही, साफसफाईचे, मोठ्या नाल्याचे. त्या विषयी असमाधान व्यक्त झाल्याने फार मोठ्या प्रमाणात गदारोळ झाला. जर ह्या वेळेला एक जे.सी.बी. तुमच्याकडे ऑलरेडी रिपेअर होऊन येते, सहा लाखाची. एल ॲण्ड टीचे बिल आहे. तुमचा जे.सी.बी. त्या ठिकाणी अडकलेला आहे. सहा लाख भरल्याशिवाय तो जे.सी.बी. तुम्हांला मिळणार नाही आणि सहा लाख रुपये तो जे.सी.बी. कंपनीने रिपेअरिंग केलेला आहे. अन्य कोणत्या दुसऱ्या गॅरजेने केले नाही. मग तो येणारा जे.सी.बी. अतिशय चांगल्या पद्धतीने येईल आणि जी पन्नास लाखाची तरतुद आपण ठेवली आहे त्यात जर आपण दोन जे.सी.बी. आणले तर त्या खर्चामध्ये येत्या ह्या बजेटमध्ये साठ लाखाचे खर्च करत आहोत. गेल्यावर्षीप्रमाणे, त्याच्या गेल्यावर्षीप्रमाणे प्रत्येक वर्षाला आपण पन्नास-साठ लाख रुपयाचा एवढाच खर्च मोठे नाले साफसफाईला

आहे आणि जे प्रशिक्षण देऊन आपण आपले ड्रायव्हर आणले आणि आपल्या खात्यामार्फत आपण नाले साफसफाई केले तर ते साफसफाई केल्यानंतर प्रॉपरली तुमच्यासमोर उभी राहणार आहे. पुन्हा आपण तो खर्च करु शकतो. कारण साठ लाख रुपये आपण गेल्या वर्षाच्या तीन वर्षामध्ये, सहा गुणिले तीन बरोबर अठरा, म्हणजे एक कोटी ऐशी लाख रुपये खर्च केलेला आहे आणि तो खर्च आपल्याला उपयोगात आलेला नाही. त्याच्यावर आपली ही सभा झाल्यानंतर मागच्या वेळेला गदारोळ झाला की, कोणत्या पद्धतीने नाले साफसफाई झाली नाही, होत नाही. शहरामध्ये मच्छर आहे. गटाराचे पाणी जात नाही हा असा गदारोळ झाला. याकरिता प्रस्ताव आला की, ही रक्कम लॅप्स न होता जर आपल्याकडे आपलेच प्रशिक्षित ड्रायव्हर झाले आणि आता आपण जुनला सुरु करतोय. आजचा महिना फेब्रुवारी आहे आणि मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यामध्ये प्रशिक्षण होऊन येईल आणि आपल्याला जसे पाहिजे तसे त्याच्यानंतर आपल्याकडे प्रामुख्याने नाले साफसफाई हा वेगळा भाग झाला. प्रामुख्याने आपल्याला जे.सी.बी. अतिक्रमणला मिळत नाही. अतिक्रमणच्या वेळी जे.सी.बी. आपल्याला मागवायला लागतो आणि मागवल्यानंतर तो जे.सी.बी. येईल तेव्हा अतिक्रमणची मोहिम सुरु होते. तर अतिक्रमण विभागालाही तो जे.सी.बी कामाला येणार आहे. अतिक्रमण विभागासाठी आणि हे मोठे मोठे नाले साफसफाई करण्यासाठी आणि आपली अन्य कामे महानगरपालिकेमार्फत चालतात. त्या ठिकाणी आपल्याला जे.सी.बी. कामाला येतो. म्हणजे आपली जी रक्कम आहे ती लॅप्स होणार नाही आणि इतर कामांना आपला जे.सी.बी. कामाला येईल आणि एका वर्षाच्या नाले साफसफाईमध्ये आपण जर खातेबाबत केली तर हे तुमच्या आमच्या घरामध्ये पडेल. ह्याच्यानंतर कार्यशाळेचेही ठेवलेले आहे. कार्यशाळेमध्ये जो आपला उड्डाणपुल आहे त्याच्या खाली जर आपण कार्यशाळा सुरु केली, तात्पुरत्या स्वरुपाची. कंपनीची कामे आपण कंपनीकडे दिली पाहीजे. आपल्याकडे फार मोठ्या प्रमाणात वाहने आहेत. फार मोठ्या प्रमाणात आपण स्वतःच्या गाड्या वापरतो. त्याकरिता नॉर्मल रिपेअरिंग, साधी दुरुस्ती, ऑईल बदली करणे किंवा एखाद्या ब्रेकची सेटींग करणे, किंवा लाईटींग करणे ही दुरुस्ती आपण वाहन कार्यशाळेत करु शकतो आणि त्याच्यामध्ये ज्या गॅरेजला आपण ठेकेदाराकडे ठेक्याने दिलेल्य गॅरेजमध्ये गाड्या पाठवतो. त्या गाड्या मेजर कामाला पाठवायच्या. त्याच्यामध्ये कुठे बदल करायचे नाही. ती मेजर कामे आपण करु शकतो. मग अशा पद्धती तुमच्या तात्पुरत्या स्वरुपाची कार्यशाळा झाली, तुमच्याकडे वाहने झाली आणि जर तुमच्याकडे प्रशिक्षित जे.सी.बी. किंवा पोकलन चालवायला जर आपण कंपनीतून आपल्याकडे माणसे मागवली तर तुमचा ह्या वेळेला जर एका वर्षामध्ये तुम्ही जर हे केले. नाले साफसफाई जर तुमच्या मार्फत केली आणि अतिशय तज्ञ आणि हुशार अधिकारी आपल्याकडे आहेत असे मला बोलायचे आहे. श्री. कांबळे सो., श्री. शिंदे सो., डॉक्टर साहेब ह्यांना कामाचा फार अनुभव आहे. कारण ह्यांनी दोन-तीन वर्षामध्ये साफसफाई केलेली आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे हा जो खात्याकडून पुर्ण विषय आलेला आहे. तर ते ह्या बाबतीमध्ये तज्ञ आहेत. कारण ही नाले साफसफाई ह्या लोकांनी १९८५ पासून करत आहे. तर मला असे वाटते की, त्या खात्याबाबत चांगली कामे करु शकतील हा विश्वास मला या ठिकाणी ह्याच्यावर व्यक्त करायचा आहे. अतिशयोक्तीपणाने हा विषय घेऊ नका. कारण त्यांनी कामे केलेली आहेत आणि जर साठ लाख रुपये जर ह्याच्यामध्ये आपले वाचले तर तुमच्या घरामध्ये जे.सी.बी. पडतील आणि जर साठ लाख रुपये वाचनू जर वाटले की, हा जे.सी.बी. नाही पाहिजे. तर तुम्ही त्या सेकंन्ड हॅन्डमध्ये विकल्या तरी तुम्हांला डबल फायदा होणार आहे. जर साठ लाखाचा फायदा होणार खर्च वर्षामध्ये एकाच वेळी करुन आपण जर नाले साफसफाई केली तर ते आपल्याला स्वस्त होईल. मागच्या वेळेला पंधरा लाखाची तरतुद केली होती आणि तेही आपल्याकडे येऊ शकतील. मग त्याचा खर्च केला तो खर्च आपण बघितला. तो खर्च तीस-चाळीस लाख रुपये एवढा आहे. आपण जे.सी.बी. भाड्याने मागवतो म्हणजे अतिक्रमणाच्या कामालाही ती जे.सी.बी. कामाला येईल. ह्या विषयाकरिता जे.सी.बी. कामाला येईल. अशा पद्धतीने जी तरतुद आहे ती तरतुद लॅप्स होणार नाही आणि आपल्यामध्ये फ्री ऑफ चार्ज पडेल असे मी तुम्हांला, या सभागृहाला माहिती देतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स सो., मिलन पाटील सो., त्यांचे जे दोन-तीन प्रश्न त्याचा खुलासा करतो. जोजफ घोन्सालवीस साहेब, आपण आपला प्रश्न नंतर कंन्टीन्यु करा. त्याच्या अगोदर मा. सभापती मी खुलासा करतो. हे जे देयक आहेत ह्याच्याबद्दल काही गोष्टी आता स्पष्ट करणे अत्यावश्यक आहे. पहिली बाब म्हणजे हे जे पाठवले आहे ते खरोखर गंभीर बाब आहे आणि आम्हांलाही ह्या प्रश्नाची लाज वाटायला पाहिजे. २००४ मध्ये हा जे.सी.बी. पाठवला होता. तत्कालीन उपायुक्त (मुख्यालय) ३०/०४/२००४ ला हे सर्व पाठवल्यानंतर ह्याचे काम पूर्ण झाले आणि पैसे देण्याचा

जेव्हा प्रश्न आला त्या वेळेस ह्याची नोट आहे, ह्याच्यावर माझी सही झाली आहे, नवव्या महिन्यामध्ये शिफारस असल्याची. माझी सही झाल्यानंतर नाकाडी साहेबांचीही सही झालेली आहे. आयुक्त साहेबांनी हे पेमेनट द्यायला मंजुरी दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

मग तुम्ही शोकॉज नोटीस काढा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आयुक्त साहेबांनी पेमेन्ट द्यायचेदेखील आदेश दिलेले आहेत आणि आता परत लेखा परिक्षक विभागामध्ये ह्यांना कुठल्या प्रकारची माहिती पाहिजे. कारण ह्याच्यात हिस्ट्री बुकाचा उल्लेख केलेला आहे की, सदर देयकाची नोंद इतिहास बुकात घेण्यांत आलेली आहे व सदरच्या देयकात यापुर्वी लार्सन ॲण्ड ट्युब्रोला अदा केलेले आहे. म्हणजे ह्याची शिफारस स्पष्टपणे केली आहे. आता सभापती साहेब आपण निर्णय घ्या की, आपण ह्या स्थायी समितीचे प्रमुख आहात. काय निर्णय घ्यायचा ह्याच्यापेक्षा अजून आम्ही काय लिहून द्यायचे आणि ह्याच्या सर्व झेरॉक्स मी आपल्याला द्यायला तयार आहे किंवा हे बिल फिरवा. आपण सर्वांनी ते पाहून घ्या. कारण वाहन विभागावर जर कोणी एलिगेशन करु असेल तर ते आम्हांला सहन होणार नाही. कारण आम्ही एवढ्या चांगल्या पद्धतीने काम करायचे आहे, तेवढे त्या पद्धतीने करत आहोत. ह्याच्यामध्ये खुद्द आयुक्त साहेबांनी शिफारस केलेली आहे. ह्याच्या व्यतिरिक्त आणखीन कोणी शिफारस केली पाहिजे ते सांगा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आयुक्त सोा. आणि उपायुक्त सोा. हे काम करतात. मग ह्याचा अर्थ अधिकारी काम करत नाही, असे वाटते. तुम्ही त्यांना शोकॉज नोटी बजावा.

**मिलन पाटील :-**

याचा अर्थ ह्याच्यात ऑडीटरची मिस्टेक आहे. साहेब, तुमच्या म्हणण्याप्रमाणे ह्याच्यामध्ये ऑडीटरने कानाडोळा केलेला आहे. ह्याचा अर्थ तोच होतो ना?

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. १५२ वर जो जे.सी.बी. व पोकलन खरेदीचा जो विषय आहे. साहेब, विषय अत्यंत महत्वाचा आहे. एका बाजुला आपण नविन जे.सी.बी. व पोकलन खरेदीसाठी सभापती साहेबांच्या अध्यक्षतेखाली विषय येत आहे. दुसऱ्या बाजुला आपली जी जे.सी.बी. आहे त्या जे.सी.बी.ची मी आता माहिती घेतली. वास्तविक उपायुक्त साहेब, ही माहिती तुम्ही द्या. कारण तुम्ही जसे बोलतात की, आम्हांला स्वतःला लाज वाटायला पाहिजे अशातला हा भाग आहे. ३०/०४/२००४ ला एल ॲण्ड टी कंपनीला वर्क ऑर्डर दिलेली आहे व वर्क ऑर्डर दिल्यानंतर ती कंपनी तुम्हांला रिटर्नमध्ये देते की, आम्ही १३/०९/२००४ पर्यंत जे.सी.बी. तुम्हांला दुरुस्त करुन देतो. आजा १३/०९/२००४ नंतर ०३/०३/२००५ आले. तर हा विषय कसा आला? सभापती महोदयांनी आज जर हा विषय विषयपत्रिकेवर आणला नसता तर कदाचित ह्या विषयावर अजुन ॲज ऑन आहे त्याच परिस्थितीमध्ये राहिले असते. साहेब, प्रश्न असा आहे की, ठिक आहे झाले गेले, चुका झाल्या. पण अशा पद्धतीच्या चुका जर आपण साठ-साठ लाख रुपयाच्या मशिनरी घ्यायला निघालो आहोत आणि अशा पद्धतीचे होत राहीले तर?

**मिलन पाटील :-**

साहेब, ह्याच्यावर आपल्याला रुलिंग द्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

लेखा परिक्षकांकडून जर अशा पद्धतीच्या चुका होत असतील आणि प्रत्येक खातेनिहाय जेव्हा अकाऊंट सेक्शन संपुर्ण स्थायी समितीच्या अधिपत्याखाली आहे. १९४९ च्या मुंबई प्रांतिक कायद्यामध्ये जी तरतुद आहे की, संपुर्णपणे आपल्या अखत्यारीमध्ये हा लेखा विभाग चालतो आणि हे लेखा विभाग चालत असतांना जर संबंधित कोणत्याही खात्याकडून जर तुम्हांला ज्या पद्धतीने फॉलो-अप एखाद्या संबंधित डिपार्टमेंटने केले आणि प्रशासनाचे प्रमुख हे आयुक्त आहेत. त्यांनी तुम्हांला २५/११/२००४ ला मार्क केले आहे की, हे पेमेंन्ट तुम्ही करावे आणि हे केल्यानंतर ते हिस्ट्री बुकामध्ये पाहिजे किंवा जॉग्राफी बुकामध्ये पाहिजे. ह्याचा फॉलो-अप करण्याचे काम आपले आहे. उपायुक्त साहेब, मला असे बोलायचे आहे, जेव्हा एखादे प्रकरण जाते तर तुम्ही त्या मिरा भाईंदर महानगरपालिकेशी संबंधित अधिकारी आहात आणि तसा जर तुमचा समज असल्यानंतर जर तुम्हांला आयुक्त साहेबांनी २५/११/२००४ ला हे मार्क केलेले आहे आणि जर तुम्ही आयुक्त साहेबांची शिफारस बाजुला ठेवून दिली आणि तुम्ही काहीच फॉलो-अप केले नाही, त्याच्यावर कार्यवाही का होऊ नये असे मला बोलायचे आहे.

कारण प्रशासनामध्ये आयुक्तांच्या पुढे कोणीच नाही आणि समितीमध्ये पदाधिकारी आहेत, महापौर आहेत, सभापती आहेत. परंतु, प्रशासनामधल्या आयुक्तांनी तुम्हांला जर ही शिफारस दिली व त्याच्यावर तुम्ही दुर्लक्ष केले, असे जर दुर्लक्षाच्या बाबी असतील म्हणून ह्या विषयाचा ठराव जो आपण आणलेला आहे, ठरावाची अंमलबजावणी. जेव्हा असे रुलिंग आम्ही देतो आणि त्या रुलिंगप्रमाणे येथे कार्यवाही झाली नाही तर मला ह्या सभागृहामध्ये त्या अधिकाऱ्याला कोणत्या पद्धतीने शासन द्यावे हे मला सांगायची गरज भासणार नाही. लेखा परिक्षक, मी तुम्हांला या ठिकाणी सांगतो, अकाऊन्ट सेक्शनला सांगतो, कोणतीही गय केली जाणार नाही. तुम्हांला जर कोणतेही काम आमच्या नगरसेवकांनी प्रस्तावित केले की, ह्या कामामध्ये आम्हांला हे काम करायचे आहे. तेव्हा तुम्ही ते १९४९ चे मुंबई प्रांतिक कलमामधले अकाऊंन्ट सेक्शन वाचता. असे बसणार नाही, बसता येणार नाही आणि होणार नाही. अशा पद्धतीचे सदस्यांना तुम्ही सल्ले देता. हे असे यापुढे हाता कामा नये. ही तुम्हांला शेवटची वॉर्निंग आहे. ह्याला कारणस्तोप प्राप्त होणार. ह्याच्यानंतर अशी जर आपली कोणतीही बिले आली आणि ती बिले तुम्ही थाबवली तर ही अत्यावश्यक बाब आहे. जर तुम्हांला अतिक्रमण तोडायचे असेल आणि आपल्याकडे जे.सी.बी. नसेल त तुम्ही काय करणार? उद्या जर ह्या शहरामध्ये पाण्याचा पुर आला, पाणी जास्त प्रमाणात झाले व आपल्याकडे जे.सी.बी. नसेल व एखादा जर एमरजन्सी नाला खोदायचा असेल तर तुम्ही काय कराल? तर काही करु शकत नाही. आजच्या परिस्थितीवरुन मी ह्या विषयावरुन तुम्हांला सांगतो, आरोग्य विभागातून सांगतो. आज या ठिकाणी काशीमिरा नाक्यावर एक नाला बुजवण्याचे काम सुरु झाले आह आणि तुमच्याकडे जे.सी.बी. नाही. तुम्ही जे.सी.बी. मागवाल तेव्हा तुम्ही कराल तर आज त्या ठिकाणी तो नाला भरल्याने संपुर्ण मिरा विभाग जो आहे, तिथे पाणी जमले आहे, गटार तुंबले आहे. ही आज वस्तुस्थिती आहे आणि जर तुमच्याकडे मशिनरी नसतील तर तुम्ही काहीही करु शकत नाही आणि माझ्या माहितीप्रमाणे कोणताही प्रस्ताव प्रशासनाने आणल की नाही हे मला माहिती नाही. नाला बुजवण्याचे काम सुरु झाले आहे. त्या ठिकाणी कांबळे, शिंदे कोण आहेत? तुम्हांला तेच सागतो, आपल्याकडे कामाची पद्धत चुकीची आहे. आपण ए.टी.पी.ला रिपोर्ट केला काय? रिपोर्ट देऊन बाजुला झालात. त्यांनी आयुक्त साहेबांचा रिपोर्ट घेतला, लेखा परिक्षकांनी आणि ते बाजुला झाले. त्यांना भूगोल आणि इतिहास पाहिजे आणि भूगोल इतिहासामध्ये पुर्ण मिरा भाईंदर महानगरपालिकेची वाताळ झालेले आहे आणि कधी कधी मला सुद्धा या डायसवर बसल्यानंतर, मलाही कठीण निर्णय घ्यावे की, घेऊ नये असे होते जे आमचे सन्मा. सदस्य व सदस्या मला नेहमी बोलतात. तर अशा पद्धतीने प्रशासनाने जी कार्यवाही करायला पाहिजे ती करत नाही. म्हणून तुम्हांला अशा प्रश्नांना समोर जावे लागते. आज तुम्ही ए.टी.पी. ला रिपोर्ट दिला, तुम्ही गप्प बसलात. ए.टी.पी.कडे जाऊन तुम्ही सांगायला पाहिजे, बघितले पाहिजे. आज ही जी परिस्थिती निर्माण होत आहे त्याला कारण ते आहे. अशा पद्धतीचा अहवाल जर पुढच्या वेळेला या सभागृहापुढे आले तर उपायुक्त साहेब मी तुम्हांला सांगतो की, कोणत्याही परिस्थितीत कार्यवाही करण्याकरिता आम्ही पुढे मागे बघणार नाहीत. ही आपल्याला शेवटची वॉर्निंग आहे. जर आयुक्त साहेबांचे ऐकत नाही, ह्याचा अर्थ काय? हे आम्ही केव्हाही मान्य करणार नाही आणि ह्याच्यानंतर मी आयुक्त साहेबांना सभेत बोलावेन. ही तुम्हांला शेवटची वॉर्निंग आहे. आयुक्त साहेबांनी जर तुम्हांला निर्णय दिला, शिफारस केले तरी तुम्ही आयुक्त साहेबांचे ऐकत नाही तर कोणाचे तुम्ही ऐकणार? आणि अकाऊंन्ट सेक्शन बाबतीत आम्ही बिलकुल खपवून घेणार नाही. ही तुम्हांला शेवटची वॉर्निंग आहे आणि ह्याच्यावर तुम्ही कार्यवाही करा आणि जर येत्या सात दिवसात हा जे.सी.बी जर आला नाही तर त्याच्यावर कोणती कार्यवाही करायची हे मला तुम्हांला सांगायला लागणार नाही. पुढच्या सभेला आपणाला कार्यवाहीला सामोरे जावे लागेल.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, सदर नाल्याच्या संदर्भात मी आपणांला सांगू इच्छितो की, वर्सोवा खाडीचा सुद्धा नाला बुझवण्यांत आलेला आहे. मी ह्यांचे पद्धतशीर पत्र दिलेले आहे. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना तिथे नेऊन दाखवलेले आहे. त्याच्यावर सुद्धा काही कार्यवाही झालेली नाही.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, या विषयाशी संदर्भित एक छोटीशी गोष्ट आहे. उपायुक्त साहेब आणि सचिव साहेब, येथे आपले किती शिपाई आहेत आणि एक पत्रकार येथे सभागृहात दरवाजा उघडून आतमध्ये शिरले. ही स्थायी समिती आहे. हा भाग काय आहे? हे चुकीचे आहे.

**गजानन भोईर :-**

एक पत्रकार आत शिरतो हे चुकीचे आहे.

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्य व सदस्या ह्यांना माझे नम्र निवेदन आहे की, सभा सुरु आहे आणि मा. महापौर मॅडम ह्या त्यांचा पदभार घेत आहेत व माजी महापौर मॅडम ह्या त्यांच्या दालनात आलेल्या आहेत. तर सदर सभा पदभारापर्यंत पंधरा मिनिटांकरिता थांबवित आहे.

(ठिक दु. १२.१० वा. सभा थांबविण्यांत आली.)

**मा. सभापती :-**

आपण सभेला सुरुवात करत आहोत.

(ठिक दु. १२.३५ वा. सभेला पुन्हा सुरुवात करण्यांत आली.)

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. १५२ वरील चर्चा पुढे चालू करण्यांत येत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, माझा प्रश्न असा आहे की, शेंडे साहेबांना विचारतो, सर्व्हे नं. ११ मध्ये दिल्ली दरबार हॉटेल पासून ते सन्मा. सदस्य आसिफ पटेल ह्यांच्या बंगल्यापर्यंत जो नाला येतो त्या नाल्यामध्ये आपण तो नाला सोडून परवानगी दिलेली आहे की, सरसकट तुम्ही परवानगी दिलेली आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी, आपण आपल्या अधिकृत चर्चेमध्ये विषय घेतोय.

**सुर्यकांत भोईर :-**

नाल्याचे, आपण जी जे.सी.बी. घेत आहोत त्याच्याबद्दल मी बोलत आहे. मी डॉक्टरांना बोललो होतो की, कृष्ण स्थळ येथे गटाराचे पाणी घुसले आहे, तो नाला तुबल्यामुळे.

**मा. सभापती :-**

साहेब, आपण बोललात आणि त्या भावना मी येथे व्यक्त केल्या.

**सुर्यकांत भोईर :-**

डॉक्टर साहेबांना बोलून महिना झाला आहे. मी येथे प्रत्येकाला बोललो आहे. नाला बुजला आहे. काय कार्यवाही करायची? पण कार्यवाही काही झालेली नाही. बिल्डर तेथे भरणी करतच चालला आहे.

**मा. सभापती :-**

ह्या विषयाचा ठराव झाल्यानंतर आपण या विषयावर चर्चा करु या.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, आपण आता जे.सी.बी. घेणार आहोत. त्याच्यात आणखीन एक छोटी जे.सी.बी. घ्यावी आणि मोठी घ्यावी. कारण छोटी जे.सी.बी. असल्याकारणाने ती कुठेही जाऊ शकते.

**मिलन पाटील :-**

पोकलनमध्ये छोटे पोकलन ७० चे पाहीजे हे आपण लक्षात ठेवा. त्याचा उपयोग गटार वगैरे स्वच्छ करतांना होतो. मोठे नाही. ९० चे नको आहे.

**मा. सभापती :-**

माहिती देतो.

**रिटा शाह :-**

माहिती नंतर द्या. पहिले ठराव होऊ द्या. ठरावानंतर आम्ही जर विचारले तर त्याच्यामध्ये माहिती द्या. स्थायी समिती विषय क्र. १५२ जे.सी.बी. व पोकलन खरेदीबाबत विचार विनिमय करणे. याबाबत मी असा ठराव मांडत आहे की.......

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपल्याला या जे.सी.बी. ची आवश्यकता आहे का? आपण साफसफाई आणि नाले साफसफाई ह्याचे आपण वर्षभराचे ठेके देणार. मग त्या आरोग्य खात्याला खरोखरच या जे.सी.बी. ची आवश्यकता आहे का? कारण ते ठेकेदार आणतील ना!

**प्रभात पाटील :-**

पण आपल्याला ठेका द्यायचाच नाही.

**मा. सभापती :-**

मोठे नाले सफाईचा ठेका द्यायचा नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

बजेटमध्ये विषय निघाला होता.

**प्रभात पाटील :-**

अशी तरतुद केली आहे की, आता ठेके द्यायचेच नाही. वर्षभर महानगरपालिकेने ते काम करायचे आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. स्थायी समिती सदस्य आपणांची अंदाजपत्रकाच्यावेळी चर्चा झाली होती. आपण मोठे नाले सफाई आणि आपली प्रभाग निहाय सफाई हे दोन्ही एकत्र करुन आपण असा मार्क मारला आहे. ठेका देण्याबद्दल. त्याच्याबद्दल आपण हा विषय घेतला आहे की, मोठे नाले सफाईचा आपल्याला ठेका द्यायचा नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपणच करायचे का?

**मा. सभापती :-**

होय आपणच करायचे आहे.

**रिटा शाह :-**

ह्या अंतर्गत मी असा ठराव मांडित आहे की, जे.सी.बी. आणि पोकलन आपल्याकडे नाला सफाई वगैरे कामे आपण दरवर्षी देतो. त्याचा साठ लाख रुपयापर्यंत आपला खर्च आहे. ते आपले वाचणार आणि जे अनधिकृत बांधकामालाही आपल्याला जे.सी.बी. नेहमी लागते. अतिक्रमण विभागाला तोही आपला खर्च वाचेल. म्हणुन हे जे.सी.बी. आणि पोकलन हे आपण मागवुन घ्यावे आणि त्याच्यासाठी आपल्याकडे साठ लाखाची तरतुद आहे, ती लॅप्स होणार म्हणुन जे.सी.बी. व पोकलन मागवुन घ्यावा असा मी ठराव मांडते. ज्या कंपनीची आपण मशीन मागविणार आहोत, त्या कंपनीमध्ये आपले जे आस्थापनाचे ड्रायव्हर आहेत. त्यांना तिथे ट्रेनिंगला पाठवुन द्यावे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, आपण ह्या ठरावात सुधारणा घ्या. हा जो पोकलन आपण मागविणार आहात. हा टाटा हिताचीचा ७० चा मागवायचा, तो लहान असतो. आपण जे डंपर खरेदी केलेले आहेत. त्या डंपरमध्ये बरोबर जातो आणि आपण त्याने कुठल्याही नाल्यावर उतरु शकतो, कुठेही आपण ते पाठवू शकतो. जो मोठा पोकलन आहे. तो आपल्याला नको आहे आणि जसे आपण जे.सी.बी. घेणार आहोत. त्याला डोझर घ्यायचे जो एक्स्ट्रा पार्ट डोझरचा येतो. ते फक्त आपल्याला लेव्हलींग करण्याकरीता कामाला येईल. ज्यावेळेला आपल्याला लेव्हलींगला घेऊन जायचे असेल तेव्हा तो डोझर लावायचा आणि त्याच्याबरोबर एक डोझर सेपरेट येतो. त्या डोझरचा पार्ट आणि जे.सी.बी. असे दोन वस्तु घ्यायचे असे मी या ठरावामध्ये सुचना मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, माझे म्हणणे असे आहे की, जे आपले नाले आहेत. त्याच्यात आपण बोट सिस्टम ठेवली तर त्याच्यामध्ये ते साफ करता येईल. मी शेंडे साहेबांना विचारले होते.

**मा. सभापती :-**

सदर विषय मंजुर झालेला आहे, पुढचा विषय आपण जे ठरावाच्या अंमलबजावणीचे आहे ते घेत आहोत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आम्हाला ठरावाच्या प्रति देण्यांत आलेल्या नाही.

**मा. सभापती :-**

आपण जे मागच्या वेळेला ठराव केलेले आहेत. त्याच्यावर नंबर टाकले त्याच्याबाबत काय झाले हे चर्चेमध्ये येईल म्हणुन आपण त्याचा फेर आढावा घेत आहोत.

**प्रभात पाटील :-**

हा असा विषय आलेला नव्हता, मला वाटते हा तुमच्या काळात पहिल्यांदा येत आहे. म्हणुन मी सभापती साहेबांना धन्यवाद देते, कारण अशाप्रकारची ही अंमलबजावणी काय झाली, खड्ड्यात गेली की कुठे गेली हे कधीच कळले नाही. रणखांब साहेब ह्याच्यामध्ये तुमचेही अभिनंदन करते. कारण टाळी दोन हाताने वाजत नाही. सभापती आणि उपायुक्त दोघांची मिळुन टाळी वाजते.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, माझ्या प्रश्नाचे शेंडे साहेबांनी उत्तर द्यावे.

**मा. सभापती :-**

शेंडे साहेब, आपण मला ह्याच्यात माहिती द्या. ह्याच्यामध्ये मी आपल्याला ॲडीशनल माहिती अशी विचारतो की, मागच्या वेळेला मी बऱ्याच वेळेला मा. स्थायी सभेच्या सदनामध्ये आणि आमसभेमध्ये मी अशा चर्चा केलेली आहे. शेंडे साहेब आपले मागचे ए.टी.पी. आणि आरोग्य विभागाचे अधिकारी येथे आहेत. असलेले जे नैसर्गिक नाले आहेत हे आपल्याला ३७ खाली त्याचे रिझर्व्हेशन दाखवायचे हे मी, नगरपालिका असतानापासुन बोलतोय परंतु, त्याच्यावर काय कार्यवाही झाली. करायला घेतली किंवा नाही किंवा आपण करु शकतो किंवा नाही करु शकतो आणि सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर ह्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, आपण जे विकासकर्त्याला काम दिले आहे. तिथे जो नाल्यामधुन पाणी येतो त्याच्यावर त्याने भरणी केलेली आहे, ही वस्तुस्थिती सध्या तिथे आहे. तर त्याच्याबद्दल आपण माहिती द्यावी.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, ह्या संदर्भात माझा विषय आहे, मी महापालिकेला पत्रही दिले आहे. आरोग्य विभागाच्या एस.आय. ने तिथे पाहणीसुद्धा केलेली आहे. परंतु तिथे लिज्जत पापडची ससा कंपनी आहे आणि जो वरुन नाला येतो. तिथे वर्सोवाची उघाडी आहे, तो नाला बुजवलेला आहे, भराव टाकुन.

**मा. सभापती :-**

तो नैसर्गिक नाला आहे का?

**केशव घरत :-**

होय.

**मा. सभापती :-**

ठिक आहे, त्याबाबत मी बोलतो.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मला माझ्या प्रश्नाचे उत्तर पाहिजे, तुम्ही मंजुरी देताना, तुम्ही नाला सोडुन मंजुरी दिली आहे की, नालासहित दिली आहे ते सांगा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, तसाच एक नाला उत्तनला आहे. उत्तनला जी खाडी आहे नवी खाडी ते पातान पालीपर्यंत खाडी आहे. त्याच्यावरही अतिक्रमण करत करत ती बुजवत चालले आहे. जसे आता आपण म्हणालात की ३७ मध्ये राखुन ठेवायचे.

**मा. सभापती :-**

नैसर्गिक नाल्याबाबतचे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

होय नैसर्गिक नाल्याबाबत, आपण ते ही एक त्याच्यात घ्यावे.

**एन. आर. शेंडे :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारला की, ए.टी.पी. ने परवानगी दिली आहे किंवा नाही, तर त्याची माहिती माझ्याकडे आता नाही. सभा संपल्यानंतर मी तपासुन सांगु शकतो.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मला सभेमध्ये माहिती पाहिजे. सभेनंतर नका, सभेमध्येच उत्तर पाहिजे. आपण तसे कागदपत्र मागवा.

**एन. आर. शेंडे :-**

पुरक माहिती अशी आहे की, जे आरोग्य विभागाकडुन पत्र आले होते. त्यासाठी मी माझ्या ऑफीसरला ऑर्डस दिल्या की, संबंधित एस.आय. सोबत जाऊन जागा पाहुन त्याबाबत रिपोर्ट मला द्यावा.

**सुर्यकांत भोईर :-**

प्लॅन मंजुर करताना तुम्ही प्रत्यक्ष जागेवर गेलेलात का?

**एन. आर. शेंडे :-**

प्लॅन मंजुर करतेवेळी जागेची पाहणी केली जाते.

**सुर्यकांत भोईर :-**

मग तुम्हाला माहिती असेल ना, नाला सोडुन परवानगी दिली आहे का? की, नाल्यासहित परवानगी दिली आहे. हे तुम्हाला माहित असेल, तुम्ही सह्या करता ना, तुम्ही पेपर बघता का नाही

**एन. आर. शेंडे :-**

त्या ठिकाणी परवानगी दिली का, नाही. याबद्दलची माहिती आता माझ्याकडे नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही ती माहिती आणा ना!

**मा. सभापती :-**

सभेनंतर तुम्ही त्यांच्या दालनात जाऊन माहिती घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

ते मग बोलतील उद्या या, परवा या हे चालु होईल. आपण सभेमध्ये माहिती आणा.

**मा. सभापती :-**

जो नैसर्गिक नाला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

कारण तिथे त्या प्लॉटची काय हकिकत आहे हे मला माहिती आहे. तिथे आदिवासी जागा आहे आणि त्या आदिवासी जागेमध्ये ह्या लोकांनी परवानगी दिली का? हे मला बघायचे आहे.

**मा. सभापती :-**

सध्या प्रश्न नाल्याचा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ठिक आहे, नाल्याचा प्रश्न आहे हे मी मानतो. त्यांनी परवानगी दिली आणि परवानगी देताना ते साईडवर गेले असतील.

**एन. आर. शेंडे :-**

परवानगी दिली किंवा नाही ते तपासुन बघु आणि दिली असेल तर कशी दिली ते ही तपासता येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, नाला बुझलेला आहे आणि त्या कृष्ण स्थळामध्ये पाणी घुसलेले आहे. त्याबाबत मी डॉक्टर तुम्हालाही सांगितले. त्या बिल्डरला जाऊन तुम्ही थांबवायला पाहिजे की येथे, भरणी करु नका.

**मा. सभापती :-**

या संदर्भामध्ये मघाशी आपल्याला उत्तर दिले, कांबळे ह्यांनी ए.टी.पी. ला रिमार्क केलेला आहे. रिमार्क कधी केला.

**राजकुमार कांबळे :-**

१७/०२/०५ ला रिमार्क केला आहे.

**मा. सभापती :-**

आणि आजची तारीख ३/३/०५ आहे. ह्या दिवसात ए.टी.पी. विभागाला पत्र प्राप्त झाले का?

**एन. आर. शेंडे :-**

त्याच्यावरुन मी माझ्या ऑफीसरला ऑर्डस दिले आहेत की, संबंधित एस.आय. सोबत जागेवर जाऊन जागा पाहुन त्याबाबतचा अहवाल माझ्याकडे सबमिट करण्यांत यावा.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे अहवाल आला का?

**एन. आर. शेंडे :-**

नाही. मी बहुतेक परवाच्या दिवशी ऑर्डर दिली आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही रिमार्क करता म्हणजे तीन दिवस अगोदर तुम्ही रिमार्क केलेले आहे. त्यावेळेस त्यांनी आपल्याला पत्र दिले. आरोग्य खात्याकडुन, तेव्हा आपल्याला माहिती असेल की नाही आपण त्या पद्धतीचे प्लॅन मंजुरी दिली का नाही, ते आपण बघितले असेल किंवा नाही, असे मी तुम्हाला विचारतो.

**एन. आर. शेंडे :-**

साहेब, तशी काय नोट नव्हती.

**मा. सभापती :-**

तशी नोट आपल्याकडे नव्हती.

**एन. आर. शेंडे :-**

तपासणी झाल्यावर तो जो नाला बंद केला, त्याला कुठली साईड आहे, ते पाहुन त्याप्रमाणे सर्व्हे नंबरची फाईल वगैरे काय मंजुर झाली असेल किंवा नसेल, त्याबाबतची माहिती काढता येऊ शकते.

**मा. सभापती :-**

आरोग्य खात्याने आपल्याला माहिती दिली, विषय असा आहे की, आम्हाला बांधकाम परवानगीचे महत्त्व नाही. हे आपल्या खात्याकडुन आपण देता आणि तो आपला अधिकार आहे म्हणुन आपण दिलात. पण विषय असा महत्त्वाचा आहे की, त्यामुळे जो नैसर्गिक नाला होता त्याला इफेक्ट झाला आहे तो बंद केला आहे. कारण नैसर्गिक नाले जर बंद केले तर कायद्यानुसार जो नैसर्गिक नाला आहे तो बंद करता येत नाही. वहिवाटीप्रमाणे आणि बंद ही करता येतो ह्या दोन्ही गोष्टी आहेत. कारण ३७ खाली असे जे नाले आहेत, त्याचा विषय पुढच्या वेळेस घेऊन येतो. असे जे ३७ खाली नाले आहेत. ते नाले प्रस्तावित करा. आज तिथे नाला बंद केल्याने मिरा भागात हालत खराब झाली. सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर व सन्मा. सदस्या जयाबाई भोईर आहेत. तिथे गेल्यानंतर तिथे शिवजयंती होती. त्यावेळी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार घालण्याअगोदर ते म्हणाले की, तुम्ही पहिल्यांदा शिवाजी महाराजांना पुष्पमाळा घालू नका. पहिली आपण ती साईट बघा त्याने आमचे हाल झाले आहेत असे त्यांनी त्याठिकाणी सांगितले. एवढे हे इमरजन्सी होते आणि त्याच्यामध्ये तुम्हाला जसे मी मघाशी बोललो कांबळेजी आणि डॉक्टर साहेब कोणत्याही पद्धतीचे पत्र दिल्यानंतर आम्ही पत्र दिले आणि बाजुला झालो हा विषय कोणत्याही अधिका-यांनी करु नये. मघाशी जो जे.सी.बी. बद्दल विषय झाला तसे विषय करु नका. जर एखाद्याने पत्र दिले तर त्या पत्राचा फॉलोअप तुम्ही करा. डिपार्टमेंटला पत्र दिल्यानंतर त्यांचे पत्र आले. पत्र येईल, मी वाट बघातोय, असे करु नका.

**सुर्यकांत भोईर :-**

रिपोर्ट दिले की, आमच्या डोक्यावरील टेन्शन संपले असे अधिकारी समजतात.

**मा. सभापती :-**

जो रिपोर्ट तुम्हाला दिलेला आहे. त्याचा अहवाल द्या आणि सुर्यकांत भोईर ह्यांना जी माहिती पाहिजे ती माहिती देण्यांत यावी.

**सुर्यकांत भोईर :-**

मला माहिती सभागृहामध्ये पाहिजे.

**मा. सभापती :-**

आता, विषय नसताना आपल्याला सभागृहात माहिती कशी मिळेल?

**सुर्यकांत भोईर :-**

माहिती मागवा. नंतर माहिती मिळणार नाही असे मी तुम्हाला सांगतो.

**मा. सभापती :-**

सभा संपल्यानंतर सन्मा. सदस्य आपण माझ्या दालनामध्ये या, मी शेंडे साहेबांना बोलावून आपल्याला माहिती देतो.

**प्रकरण क्र. १५२ :-**

जे.सी.बी./ पोकलन खरेदीबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १६५ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील नाले सफाई, छोटे नाले, गटारे त्याचप्रमाणे अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेसाठी वेळोवेळी पोकलन भाड्याने घेण्यात येत असतो. त्यावर मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. पावसाळ्यापुर्वी जरी नाले सफाई केली तरी नागरिकांकडून टाकण्यात आलेला खल, कचरा व इतर घाण यामुळे नाल्याचे प्रवाह बंद होतात. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. या वस्तुस्थितीचा विचार करुन महानगरपालिकेसाठी एक जेसीबी व एक पोकलन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच सदर दोन्ही मशीन सुस्थितीत राहणेचे दृष्टीने व त्यायोग्य रीतीने चालविणेसाठी महानगरपालिकेचे ४ वाहन चालक प्रशिक्षित होणे आवश्यक आहे तसेच हिटाची ई एक्स ७० या पोकलन मशिनचे देखील दरपत्रके मागवून घ्यावी कारण सदर बाबत महापालिका क्षेत्रातील छोट्या रस्त्यावरील गटारे, कच्चे नाले, मशिन छोट्या रस्त्यावर घेवून जाणे सोईचे होईल.

उक्त कामासाठी करण्यात आलेली अंदाजपत्रकाचे तरतूद संपण्यास एक महिन्याचा कालावधी आहे. सदर वेळेत पोकलन मशिन खरेदी न केल्यास आर्थिक तरतूद संपणार आहे. वरील सर्व परिस्थितीचा विचार करुन, तसेच अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील रु. ५०,००,०००/- इतकी तरतूद

विचारात घेवून टाटा हिटाची या मूळ उत्पादक कंपनी व अधिकृत विक्रेता यांचेकडून टाटा हिटाची ई एक्स ११० व टाटा हिटाची ई एक्स ७० या दोन मॉडेल मधून महापालिका भौगोलिक बाबी, गरज, विचारात घेवून पोकलन मशिन व जेसीबी एल ॲन्ड टी कंपनीचे डोझर (लेव्हलिंग) पार्टसह आरोग्य विभागामार्फत खरेदी करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५३ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतोय, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या बाबत बऱ्याच वेळेला सभागृहामध्ये सभापटलावर सन्मा. सदस्यांकडुन या विषयाची विचारणा नेहमीच होत आलेली आहे आणि प्रत्येक सदस्य अगदी पोटतिडकीने आपल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीबाबत अगदी आस्थेने त्याची चौकशी करत असतो. सर्वप्रथम मी आपणाला धन्यवाद देतो. कारण आपल्या सभापती पदाच्या ह्या कार्यकाळामध्ये हा विषय आपण विषय पटलावर आणलेला आहे. आस्थापना विभागामध्ये काम करत असताना मागे २८ फेब्रुवारी, २००२ रोजी ज्यावेळेला महापालिका घोषित झाली. त्याच्यानंतर हा विषय ३१ ऑक्टोबर २००२ च्या सभेमध्ये मा. महासभेमध्ये आपण एकुण ७४ पदांना त्यावेळी मंजुरी दिलेली होती. सदर प्रस्ताव आपण शासनाकडे पाठविलेला होता. परंतु, त्याबाबत आजही कोणत्याही पद्धतीची कार्यवाही झालेली नाही. जवळ जवळ तीन वर्ष ह्या गोष्टीला होत आहे. तरी, सभापती महोदय प्रकरण क्र. १५३ वर आस्थापना विभागातील कामकाजावरील विचार विनिमय करणे याबाबत मी सभा पटलावर असा ठराव देत आहे.

**अशोक पाटील :-**

साहेब, निदान गोषवारा कशा संदर्भातला आहे. विषय कोणी आणला आहे? प्रशासनाने आणला आहे की, सभापती साहेबांनी आणला आहे. त्याची व्यवस्थित माहिती द्या.

**मा. सभापती :-**

मी जेव्हा प्रथमवेळा सभापती होतो. त्यावेळी सुद्धा जे आपले पालिकेचे कर्मचारी आहेत, त्यांच्या पदोन्नती विषयी मी अनेकवेळा चर्चा केली. परंतु, त्यावेळेला त्यांची माहिती नाही. अशा काही गोष्टी आपल्यासमोर आल्या आणि त्या विषयाची प्रशासनाकडे पुर्ण माहिती नसल्याकारणाने त्यांनी तो विषय मला दिला नाही. आज पहिली वेळ गेली, सेकेन्ड टर्म गेला थर्ड टाईम आता आलेला आहे, हे तिसरे वर्ष सुरु आहे आणि जे आपले सन्मा. अधिकारी आहेत. ह्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव त्याठिकाणी राहिलेला आहे. त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे, आस्थापनेमध्ये आणि विविध जे अधिकारी आहेत त्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे. तशा पद्धतीची चर्चा होणे फार जरुरी आहे. कारण प्रशासनाला काही अडीअडचणी निर्माण होत असेल, तर आम्ही आमच्या पद्धतीने, आमच्या भावना आणि आमचे ठराव आम्ही दिले तर त्या ठरावावर पुढे कार्यवाही प्रशासनाने केली पाहिजे, आपण कुठे मागे पडलो हा विषय होता कामा नये आणि आम्हाला अनेक वेळा अशा बाबी आढळुन येतात की, माहिती मिळत नाही, माहिती नाही, तर मी सभापती ह्या नात्याने हा विषय या येथे घेतलेला आहे. त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे. चर्चा होऊन ज्यांना आपणाला पदोन्नती द्यायची आहे, त्यासाठी काय निकष आहेत, काय आहेत, ते लावुन त्याच्यावर चर्चा घेऊन हा ठराव आपण पारित करुन दिला. तर त्या लोकांना पदोन्नती मिळण्यासाठी आपल्याकडुन रस्ता मोकळा होईल. अशी धारणा होती म्हणुन आपण हा विषय याठिकाणी आणलेला आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, या विषयाची चर्चा व्हायला पाहिजे. पण तो विषय त्या अगोदर आम्हाला समजायला पाहिजे. ह्याच्या संदर्भात प्रशासनाच्या काय अडचणी आहेत. प्रशासनाने काय प्रयत्न केलेले आहेत. त्यांच्यासमोर कुठे अडीअडचणी आहेत. त्या आपण आम्हाला विशद करा.

**मा. सभापती :-**

हा विषय आपण करुन घ्यायचा आहे. ह्या विषयी आपल्याला काही अडीअडचणी असतील, त्याची जी माहिती असेल तर प्रशासन याठिकाणी आहे. तुम्हाला जी माहिती पाहिजे, ते बोला. हा विषय प्रशासनाने आपल्याला दिला नाही. हा विषय आपण घेतला आहे. आपण घेतलेल्या विषयाची सर्वांनी चर्चा करायची आहे. चर्चेमधुन जी माहिती तुम्हाला पाहिजे, जसे आपण बोला की, आम्हाला ही माहिती पाहिजे. येथे आस्थापना विभागाचे अधिकारी आहेत, उपायुक्त साहेब त्यांना आपण विचारा की, तुम्हाला काय माहिती पाहिजे.

**अशोक पाटील :-**

आपण हा विषय पहिल्यावर्षी आणला होता आणि आता ही आणला, तुमचे त्रिवार अभिनंदन. परंतु प्रशासनाची पदोन्नतीबद्दल भुमिका काय आहे? किंवा त्यांच्या अडीअडचणी काय आहेत? त्या आपण विशद केल्यांनतर आम्ही आमचा निर्णय घेणारच आहोत. आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत आणि ज्यांच्यावर अन्याय होत असेल त्यांना न्याय मिळविण्यासाठी हे सभागृह सक्षम आहे. परंतु, प्रशासनाच्या ज्या काही अडीअडचणी असतील ह्या संदर्भातल्या त्यांनी त्या विशद करावे.

**रिटा शाह :-**

सर्वप्रथम हा विषय पदोन्नतीचा मा. महासभेला आला होता.

**अशोक पाटील :-**

पदोन्नतीचा विषय हा नगरपालिका असताना पासुन आहे.  मी देखील त्यावेळी ह्या प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना सांगितले होते. परंतु, त्यावेळी देखील तो झालेला नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, महत्त्वाचे म्हणजे त्याच्यामध्ये वर्ग - ३ आणि वर्ग - ४ चे त्याच्यामध्ये आले होते.

**मा. सभापती :-**

वर्ग - ३, वर्ग - २, आणि वर्ग - १ .

**रिटा शाह :-**

तेव्हा आपल्याकडे एकच विषय पेन्डींग झाला होता की, आपल्याकडे सेवा नियम नाही आणि एल.एस.जी.डी. हे कंपलसरी आणि त्यांचे सेवा नियम आणि त्यांच्या प्रमोशनाच्या अटीशर्ती.

**अशोक पाटील :-**

सेवाजेष्ठता आणि रोष्टर ह्या दोन गोष्टींची कमतरता होती.  त्याची पुर्तता झाली आहे किंवा नाही आणि पुन्हा एल.एस.जी.डी. अशा काही अटी आहेत का?

**रिटा शाह :-**

एल.एस.जी.डी. किती, पदवीधर किती असे उमेदवार सांगा.

**अशोक पाटील :-**

क्वॉलिफिकेशनच्या काय अटी आहेत का, ते आपण विशद करा म्हणजे आपल्याला निर्णय घ्यायला बरे होईल.

**मा. सभापती :-**

आपण प्रशासनाला मोघम ठराव करुन द्यायचा आहे आणि ज्या पद्धतीने प्रत्येक गोष्टीमध्ये त्यांच्या क्वेअरी आहेत.  त्याच्यामध्ये जर असा विचार केला की, शासनाकडून वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ पदाचे आरक्षण अशा पद्धतीची पदे भरावयाचे प्रमाणित करुन घ्यायचे आलेले आहेत. शासनाकडुन पदे मंजुर होऊन तीन वर्ष होत आलेले आहे. पंरतु प्रशासनाने सर्व पदावर अजुनपर्यंत पदोन्नती दिलेली नाही. ती माहिती त्यांच्याकडुन येत नाही, त्यांनी विषय दिलेला नाही. मग माझे असे म्हणणे होते की, जी पदे आहेत त्याच्यावर मिरा भाईंदर आस्थापनेवर बरेचसे अधिकारी ग्रामपंचायत काळापासुन आहेत. त्यांची सेवा ज्येष्ठताही आहे. त्यांचा अनुभव आपण आपल्याकडुन लक्षात घ्यायला पाहिजे आणि शासनाकडुन जी पद मंजुर झालेली आहेत. तर असा एक मोघम सेवा ज्येष्ठता पदोन्नती या अशापद्धतीचे मोघम ठराव करुन घेऊन त्यांना आपणाला कामाला लावायचे आहे आणि त्यांच्याकडुन माहिती ही येत नाही. ते सांगतात की, ह्याच्यामध्ये त्रुटी आहे. सेवा नियम झाले नाहीत. अमुक एकाची सेवा ज्येष्ठता यादी मिळाली नाही, हे नाही आणि ते नाही असे सांगतात. पण आपण हा विषय घेऊन, आपण सरसकट हा विषय यांच्याकडे देऊन टाकायचा की, आम्ही हा ठराव केलेला आहे, ते तुमच्या नियमामध्ये बसुन सेवा ज्येष्ठतामध्ये बसुन हा ठराव आम्ही करतो त्या ठरावाचे आपण इम्प्लीमेन्टेशन करावे.

**अशोक पाटील :-**

म्हणजे प्रशासन आपल्याला माहिती देत नाही का?

**मा. सभापती :-**

प्रशासन सांगते की, आमची तयारीच नाही.

**रिटा शाह :-**

तेच महत्त्वाचे आहे ना, की त्यांच्याकडे सेवा नियम नाही. सेवा नियमाशिवाय ते पदोन्नती देणार कसे?

**अशोक पाटील :-**

ठेका पद्धतीचे चौदा इंजिनिअर डायरेक्ट कायम होतात आणि हे आपले ग्रामपंचायत काळापासुन असलेले कर्मचारी ह्यांना फक्त पदोन्नती देण्यासाठी आपल्याकडे कायदे आडवे येतात का? आम्हाला हे जाणुन घ्यायचे आहे. ठेका पद्धतीचे चौदा इंजिनिअर तुम्ही परमनंट करु शकता. नगरपालिका असल्यापासुन आम्ही कोकलतोय, बोंबलतोय. हे इथले स्थानिक लोक आहेत आणि ह्यांच्यावर अन्याय होत आहे हे आम्हाला जाणवते.

**मिलन पाटील :-**

त्यावेळेला त्याला ही काही नियम लावले असतील ना! ज्यावेळी आपण ते इंजिनिअर येथे परमनन्ट केले त्यांना ही नियम असतील का नाही. मग आपल्या कर्मचाऱ्याला का? का नसावे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य हा प्रश्न कुठेतरी मार्गी लागावा म्हणुन सभापती साहेबांनी विषय आणला.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आज हा जो विषय सभेसमोर आला आहे, या विषयाची कल्पना आम्हाला कुठलीच नव्हती. आस्थापना कामकाजाबाबत विचार विनिमय करणे. नक्की काय विचार विनिमय करणार हे आमच्या आकलनाच्या बाहेर होते. जर असा विषय आहे. ह्याची कल्पना असती तर आम्ही नक्कीच तयारी करुन आलो असतो. आता आपले इन्टेशन, आपल्या मनात काय चालले आहे, हे कळले. आपल्याला जो काही निर्णय घ्यायचा आहे तो घ्या. पुढच्या सभेसमोर आपल्याला सविस्तर माहिती आम्ही देऊ. आमच्या सामान्य प्रशासन विभागाकडुन माहिती देऊ.

**मा. सभापती :-**

तुमची माहिती आम्हाला पाहिजे. पण विषय असा आहे की, आम्हाला ठराव करायचा आहे आणि हा आम्ही ठराव केल्यानंतर जे तुम्हाला माहीती आम्हाला द्यायची असेल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

तुम्हाला काय ठराव करायचा आहे तो ठराव आपण करा.

**मा. सभापती :-**

त्याचे इम्प्लीमेन्टेशन काय कसे करायचे ते तुम्ही आपण आम्हाला सांगा.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, मला असे सुचित करायचे आहे. तुम्ही हा जो विषय येथे पटलावर घेतलेला आहे. आस्थापना विभागातील कामकाजाबाबत विचार विनिमय करणे. फक्त विचार विनिमय करणे अशा संदर्भातलाच तुम्ही विषय घेतला आहे आणि तुम्ही ठराव करुन त्याचे इम्प्लीमेन्टेशन कसे करणार? प्रशासन ह्याच्यावर कसे करेल.

**मिलन पाटील :-**

प्रशासनाला सांगायचे तुम्ही जे पुढच्या सभेत घेऊन येता ते आम्हाला होकारार्थी पाहिजे.

**अशोक पाटील :-**

आमचे असे म्हणणे आहे की, तुम्ही स्पेसिफिक विषय घेऊन या. ह्यात कुठली अडचण आहे.

**मिलन पाटील :-**

आम्हाला होकारार्थी पाहिजे. कारण ह्या कर्मचाऱ्यांनी ग्रामपंचायत काळापासुन काम केलेले आहे. ते विदाऊट ए.सी. मध्ये काम केलेले आहे आणि त्या लोकांनी ग्रामपंचायतीची नगरपालिका केली, नगरपालिकेची महानगरपालिका केली. त्यांच्या नंतर त्यांनी जे महानगरपालिकेतसुद्धा काम केले आहे ते बिना ए.सी. ने काम केलेले आहे आणि या शहराची त्यांनी सेवा केलेली आहे. या शहराकडुन आम्हाला त्यांना काही द्यायचे आहे. ते आमचे कर्तव्य आहे.

**अशोक पाटील :-**

आपण हा विषय स्पेसिफिक घ्या. प्रशासनाची टिपणी काहीही असू दे. आपण ठराव करुन देऊ. हा समितीचा सक्षम अधिकार आहे.

**मिलन पाटील :-**

महासभा ही सुप्रीम आहे. आपण येथे ठराव केल्यानंतर महासभेसमोर विषय आणा.

**मा. सभापती :-**

आपल्या स्थायी समितीलाही त्याचे पुर्णपणे अधिकार आहेत.

**अशोक पाटील :-**

म्हणुन सांगतो ना, तुम्ही तो स्पेसिफिक विषय का घेतला नाही.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, हा जो विषय आलेला आहे आणि रणखांब साहेब त्याला अनुसरुन बोलले की, त्यांना तो विषय कळला आहे. आता बोलते ती वस्तुस्थिती कदाचित नसेल व नसावी. पण असे आहे की, ते म्हणाले की तुम्ही ठराव करा आणि त्याचे काय करायचे ते आम्ही बघतो. तर विषय नसताना आपण तो ठराव करणार. कारण विषय फक्त कामकाजाचा आहे. त्याच्यावर विचार विनिमय करण्यांचे आणि आपण पर्टीक्युलर मागच्या आपल्या ग्रामपंचायत काळापासुनच्या कर्मचा-यांच्याबाबीत आपण न्याय देण्याच्या विषयाचा ठराव करणार आहोत. कदाचित, प्रशासनाने असे म्हणायला नको, कायद्याच्या चौकटीमध्ये हा विषय नव्हता आणि तुम्ही असा ठराव केला आहे. त्याच्यामुळे आपण हा विषय पर्टीक्युलर घ्या. तुम्ही तसा तो विषय घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडम, सन्मा. सदस्य अशोक पाटील ह्यांनी या विषयावर जी चर्चा केली. त्या चर्चेचे सार आपल्या लक्षात आले. आपण पदोन्नतीबाबतचा विषय पुढच्या सभेत घेत आहोत आणि आयुक्त साहेब आणि सचिव आणि आस्थापनाचे अधिकारी यांना ह्या ठिकाणी सुचित करतो की, पुढच्या वेळेला आपण आम्हाला पदोन्नतीबाबतची जी माहिती आहे, ती माहिती आम्हाला सादर करावी आणि पुढच्या सभेत आपण हा निर्णायक विषय ठेवुन देवु.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदयांना माझी विनंती आहे की, १५३ क्रमांकाचा जो विषय आहे, आस्थापना विभागातील कामकाजाबाबत विचार विनिमय करणे, ह्याच्यामध्ये असे ॲडीशनल घ्या की, ह्या विचार विनिमय अंतर्गत की, आपल्या आस्थापनेमधील जे अधिकारी आहेत त्यांच्या पदोन्नतीबद्दल विचार करुन निर्णय घेणे असे आपण त्याच्यामध्ये समाविष्ट करा.

**रिटा शाह :-**

त्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अशोक पाटील :-**

तो ठराव सन्मा. सदस्य मिलन पाटील आपणांला वाचून दाखवतात.

**कैलासबेन जानी :-**

आपण हे पुढच्या सभेत आणायला सांगावे.

**अशोक पाटील :-**

पुन्हा घेतील किंवा नाही घेतील. ठिक आहे, हा आपल्या कर्मचा-यांचा विषय आहे. प्रशासन पुन्हा आणू देतील, न देतील. ही आपली ग्रामपंचायत काळापासूनचे कर्मचारी आहेत.

**रिटा शाह :-**

आपले कर्मचारी आहेत त्यांचे व्हायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

आपण तो कर्मचा-यांचा विषय घ्या. तो विषय घ्यायलाच पाहिजे. तो विषय पुढे येईल, न येईल.

**गजानन भोईर :-**

पण ते कर्मचारी सर्व जुने आहेत का? आणि किती आहेत?

**हॅरल बोर्जीस :-**

सात-आठ आहेत.

**प्रभात पाटील :-**

जे ग्रामपंचायत काळापासून जे आपले कर्मचारी आहेत ते ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका याच्यामध्ये कार्यरत असलेले. सुरुवातीपासून शेवटपर्यंत ज्या कर्मचा-यांनी ह्या शहराच्या विकासासाठी काम केले आहे आणि आजही करत आहेत. तर त्यांना योग्य तो न्याय मिळाला पाहिजे या दृष्टीने आपण काहीतरी करायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

या ठरावावर कोणी अनुमोदन देऊ नका. देऊ नका असे नाही, या ठरावावर सर्व सन्मा. सदस्यांचे अनुमोदन आलेले आहे.

(सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी प्रकरण क्र. १५३ च्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**रिटा शाह :-**

१९९९ पासून जे आपल्या महानगरपालिकेत काम करत आहेत त्यांच्याबद्दल तुम्ही एवढी काळजी करता आणि जे ग्रामपंचायत काळापासून आहेत त्यांची काळजी कोण करणार?

**मिलन पाटील :-**

त्यांच्याबद्दलही हा ठराव आहे.

**रिटा शाह :-**

हे नंतर करा. पहिल्यांदा जे ग्रामपंचायत काळापासून आहेत त्यांचे काम करा. आपले जे जुने कर्मचारी आहेत त्यांचे आपण पहिले करा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी जो ठराव दिलेला आहे. १५३(अ) आणि (ब) मध्ये १५३(ब) मध्ये ज्या तीन कर्मचा-यांचे नांव दिलेले आहे त्यांची सेवाजेष्ठता त्यांनी ज्या दिनांकापासून तात्पुरत्या सेवेमध्ये लागले फक्त त्यांनी त्या बाबतीमध्ये सन्मा. महापौर साहेबा, मा. आयुक्त आणि मा. सभापती साहेब ह्यांच्याकडे त्यांनी लेखी मागणी केली होती की, आमची सेवाजेष्ठता ज्या दिनांकापासून मी सेवेमध्ये लागलो तेथून सेवाजेष्ठता यादीमध्ये नांव घ्यावे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आज हा विषय नाही आहे.

**रिटा शाह :-**

तो कायम स्वरुपाचा आहे आणि असा ठराव तुम्ही मांडू शकत नाही. त्याचा ठराव तुम्ही करु शकत नाही.

**गजानन भोईर :-**

हा आजचा विषय नाही आणि त्याच्यात तुम्ही मिक्सअप करु नका. तुम्ही ह्याच्यावर विषय घ्या आणि आपण आता जो पहिला ठराव मांडला तो मान्य करा.

**रिटा शाह :-**

ग्रामपंचायत काळापासून आपले जे स्थानिक उमेदवार आपल्याकडे ग्रामपंचायतीपासून कामे करतात. त्यांच्याबद्दल विचार करा आणि नंतर हा विषय तुम्ही आणा.

**गजानन भोईर :-**

पहिला जो ठराव आहे, त्याला आमचे अनुमोदन आहे. दुस-या ठरावाला आमचे अनुमोदन नाही.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, हा जो दुसरा ठराव आहे हा स्पेसिफिक पुढच्या सभेमध्ये घ्या. त्याच्यामध्ये ५३८ मधलेही काही कर्मचारी आहेत. त्यांच्याही अशा काही समस्या आहेत. ते आस्थापना विभागाकडून तुम्ही तपासून घ्या आणि ते दोन्ही विषय पुढच्या सभेत घ्या. ग्रामपंचायत काळातील कर्मचा-यांसाठी जो पहिला ठराव केला आहे तो मंजुर करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

पहिला ठराव मंजुर करुन घ्या आणि दुसरा पुढच्या सभेत घ्या.

**प्रकरण क्र. १५३ :-**

आस्थापना विभागातील कामकाजाबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १६६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी झालेली असून महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नव्याने पदनिर्मिती करण्याकरिता मा. प्रशासकीय ठराव क्र. ७१, दि.

२९/०४/२००२ अन्वये ठराव पारीत करुन शासनास पाठविण्यांत आलेला होता. शासनाने शासन निर्णय क्र. एमबीएमसी-२००२/१७७३/प्र.क्र.१६३/नवि-२५, दि. ३१ ऑक्टोबर २००२ अन्वये एकूण ७४ पद निर्मिती प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. सदर मंजूर पदानुसार शासकीय नियमानुसार शासनाकडून वर्ग-३ व वर्ग-२, वर्ग-१ पदांचे आरक्षण व पदे कशाप्रकारे भरावीत हे प्रमाणीत करुन घेण्यांत आलेले आहे. शासनाकडून पदे मंजूर होऊन तीन वर्ष होत आलेली आहेत. परंतू, प्रशासनाने सदर पदांवर अजुनपर्यंत पदोन्नती दिलेली नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर बरेच अधिकारी हे ग्रामपंचायत काळापासून नंतर नगरपरिषद पासून आजपर्यंत काम करित असून सदर कर्मचारी, अधिकारी ह्या पदोन्नती होणे आवश्यक आहे. तरी सेवाजेष्ठता, अर्हता व अनुभव लक्षात घेता सदर कर्मचारी ह्या शासनाकडील मंजुर पदावर त्वरीत पदोन्नती देण्यांत यावी असा ठराव पारित करीत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १५३ :-**

आस्थापना विभागातील कामकाजाबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १६६(अ) :-**

दि. १४/०५/२००५ रोजीच्या सभेमध्ये इतिवृत्तांत मंजुरीच्या वेळी सदरचा ठराव वगळण्यांत यावा असे ठरविण्यांत आले.

**सुचक :- सौ. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिव प्रकरण क्र. १५१ चा विषयाचे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

जी प्रत दिली आहे. त्यात तारखेमध्ये चुक झालेली आहे. दुस-या पानावर जे २००५ झाले आहे. तिथे २००४ असे घ्यावे.

**मा. सभापती :-**

जेव्हा आपला हा कार्यकाल सुरु झाला. जे आपण ठराव केले आहेत, ते घेतले.

**अशोक पाटील :-**

मागचेही घेतले तर चांगले झाले असते.

**मा. सभापती :-**

ते आपण नंतर बघु. पहिल्यांदा हे जे आहेत ते घेऊ.

**अशोक पाटील :-**

म्हणजे सुरुवात करत आहात.

**रिटा शाह :-**

आपण जो विषय घेतलेला आहे. त्याबद्दल मी सुरुवातीलाच आपले अभिनंदन केलेले आहे. परंतु, आता आपण ह्याच्यामध्ये दिनांक, विषय, विभाग, मंजुर किंवा नामंजुर, ठराव क्रमांक आणि केलेली कार्यवाही. केलेल्या कार्यवाहीमध्ये आपण फक्त एवढे दिले आहे की, तो ठराव आपण त्यांना पोहचवले. मला असे वाटते की, आज आपण एवढा चांगला विषय डायसवर घेतलेला आहे. तर आपण एक-एक विषय घेऊ, एक-एक ठराव घेऊ व त्याच्यावर आपण साधक बाधक चर्चा करु.

**अशोक पाटील :-**

ठरावाची प्रत संबंधित विभागाला दिली म्हणजे काय कार्यवाही होणार नाही.

**प्र. सचिव :-**

सचिवांनी फक्त दिले आहे.

**मा. सभापती :-**

या संबंधित जे अधिकारी आहेत, ते अधिकारी येथे उपलब्ध पाहिजे आणि आम्ही त्यांना विचारणा करु. पहिला ठराव इतिवृत्तांताचा आहे, तो आपणच करतो आणि दुसरा ठराव मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांची गणना करणेबाबत.

**रिटा शाह :-**

कुठपर्यंत तुमची गणना झाली, किती झाडांना रंग लावले, किती झाड तुम्ही मोजले आणि तुम्ही ते कुठुन चालु केले आहे झाड मोजायचे.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, ह्याच्या अगोदरची माहिती आपण मागच्यावेळी दिली होती. त्यांच्या अगोदर आपण जे वृक्ष लावली होती.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्य सगळ्यांना विनंती आहे की, रितसर आपण जाऊ या. आता जो ठराव आहे, त्या ठरावाचे आपण वाचन करा आणि मग त्याच्यावर चर्चा होऊ द्या.

**गजानन भोईर :-**

आपली ह्याच्या अगोदर जी चर्चा झाली होती, मागची झाडे लावलेली ते ही आपण ह्याच्यात चर्चेला घ्या. ते कशाला आपण बाजुला ठेवता.

**सुर्यकांत भोईर :-**

वनखात्याचे अधिकारी कुठे गेले? त्यांनी किती गणना केली, काय केले ते सांगा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपल्याला अशी विनंती आहे की, सगळ्या अधिकाऱ्यांना आपण हजर राहायला सांगा. श्री. इरकरांना आपण विचारल्यावर ते आता माहिती आणायला गेले आहेत.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मला असे वाटते की, वृक्षांचा विषय आला आणि ते माहिती गोळा करण्यासाठी कुठेतरी गेले. तर मला असे वाटते जेवढे ठराव येणार आहेत. तर वृक्ष गणना कुठुन चालु केली? किती गणना झाली? सभापती साहेब, आपण जो ठरावाचा विषय आमच्याकडे आणला आहे, अंमलबजावणीचा त्या विषयाच्या अंतर्गत जर त्याची माहिती आता उपलब्ध नाही तर आपण ते पुढच्या सभेत घेणार आहोत. पण त्या अगोदर ह्याच्यामध्ये एक ठराव आहे. आरोग्य विभागाचा, त्याचा रिपोर्ट आपण त्या स्थायी समितीमध्ये डिक्लेअर केले होते की, सभा संपल्यानंतर देऊ. मी पत्रव्यवहार केला आणि भरपुर त्याच्यामध्ये डोकेफोडी केले आणि मला आजपर्यंत आराद्मग्य विभागाचा गोपनीय रिपोर्ट मिळाले नाही. त्या अंतर्गत मी मुख्यालयाकडे ही गेले होते, बावस्कर साहेबांकडे गेले होते. त्या लोकांनी मला लेखी उत्तर दिले आहे. तर आज या सभेत त्या ठरावाच्या अंतर्गत मी आपल्याला हे पत्र देत आहे आणि मला चार तारखेपर्यंत ह्या रिपोर्टची कॉपी मिळाली नाही. तर आपला जो मुख्य महानगरपालिकेचा जो दरवाजा आहे, तिथे मी ४ तारखेला सकाळी ११.०० वा. धरणावर बसणार आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपण सन्मा. सभापतींना जे पत्र दिले आहे, त्यामध्ये आपण चार तारीख मेन्शन केले आहे. जर आपल्याला धरणे आंदोलन त्या पद्धतीचा अवलंब करायचा असेल तर पुर्ण तीन दिवस आधी तुम्हाला इन्टीमेंशन पत्र प्रशासनाला द्यायला पाहिजे. त्या अनुषंगाने तुम्ही पुर्ण तीन दिवसाचा अवधी देऊन त्याच्यानंतर करता येईल.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी जे पत्र दिले. त्याच्यावर आपण जी चर्चा केली, वेळेबद्दल तत्पुर्वी मी सन्मा. सदस्यांना विनंती करेन की, याठिकाणी विभागाचे डॉ. बावस्कर आहेत. आपण हे पत्र या सभागृहात दिले आहे, चालु सभेमध्ये आपण दिले आहे. या पत्राचे वाचन होऊन जर आपल्याला ह्यावेळी जर हे उत्तर देत असतील, समाधानकारक तर आपल्याला विषयी करता येणार नाही. कारण आपण ह्याच्यामध्ये सरळ दिलेले आहे की, मुक धरणावर बसावे लागेल. म्हणजे सन्मा. सदस्या ह्या स्थायी समितीचे सदस्या असुन आपण जे पत्र दिले आहे ते पत्र जाणीवपुर्वक विचार प्रशासनाने केला

पाहिजे आणि त्याच्यावर समाधानकारक उत्तर मिळणे हे क्रमप्राप्त आहे, असे मला वाटते म्हणुन या पत्राचे वाचन होऊन या पत्रावर संबंधित खात्याकडुन आपल्याला जी माहिती ती माहिती येथे उपलब्ध करुन दिली व त्यांना समाधान मिळाले तर पुढचा विषय टळु शकेल. अन्यथा आपण जे पत्र दिले आहे. त्या पत्राप्रमाणे पुढे कार्यवाही करावी. अशी विनंती करतो.

**रिटा शाह :-**

स्थायी समिती अध्यक्ष साहेब, आपण जे बोललात त्यावर मी ही विचार केला होता म्हणुन मी दिड महिने गप्प बसले होते. आपला विषय संपल्यानंतर आपल्यालाही जाणीव आहे की, किती टाईमपास झालेला आहे. परंतु, माझी मागणी फक्त रिपोर्टची आहे.बाकीची मला काहीच माहिती नाही. रिपोर्टची कॉपी मिळत नाही. या कार्यालयामधुन त्या कार्यालयामध्ये माझी नाचानाची झालेली आहे. म्हणुन आता एका जागेवर बसुन मी कॉपी मागणार आहे. ते आज देणार असेल आणि आता देणार असेल तर मी माझे पत्र मागे घेते.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपल्या पत्राचे गांर्भीयाने सभापती महोदयांनी जी कार्यवाही केली आणि ह्याचा संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी रितसर खुलासा केला तर बरे होईल. सभापती महोदयांच्या आदेशाने सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी जे सभागृहात पत्र दिले आहे. त्याचे वाचन करतो. (पत्राचे वाचन करण्यांत आले.) आपण जी ०४/०३/२००५ धरणा धरण्याची तारीख दिली आहे ती ०७/०३/२००५ करावी.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांच्या पत्राचे येथे वाचन केलेले आहे. मुख्यालय उपायुक्त आणि आरोग्य विभागाचे डॉक्टर बावस्कर हे दोन्ही अधिकारी या येथे आपल्यासमोर आहेत. आपल्या या पत्रामध्ये दोन्ही अधिकाऱ्यांचा उल्लेख केलेला आहे. तर आपल्याला या ठिकाणी जर स्पष्टीकरण देता येत असेल तर अतिशय चांगले आहे. अन्यथा त्यांची जी पुढील कार्यवाही आहे, ती आपल्याला थांबविता येईल. तरी मी दोन्ही अधिकाऱ्यांना या ठिकाणी विनंती करतो की, आपण अशा पद्धतीच्या माहितीपत्रामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे आपल्याकडे माहिती उपलब्ध असेल तर आपण त्या पद्धतीने त्यांना उत्तर द्यावे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

मा. सभापती साहेबांनी आदेश केल्याप्रमाणे, मी अशी माहिती देत आहे की, सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांना मी अशी विनंती करेन की, त्यांनी हा मार्ग अवलंबु नये. त्यांनी उपोषणाला बसु नये ही माझी त्यांना विनंती असेल. दुसरा प्रश्न जो आहे तो अहवालाबद्दलचा. अहवालाबद्दल माझ्या दालनात, आपण पत्रामध्ये वाचन करताना तसे ऐकले की, स्पष्टपणे मी माझा त्यावेळीही दिलेला आहे आणि परत माझ्या विभागाकडुन लेखी, संबंधित कर्मचाऱ्यांच्या मार्फत नविन प्रस्ताव तिथे पाठवलेला आहे. तरी ह्याच्याबद्दलची मी सविस्तर अशी माहिती घेतो की काय पोझीशन त्याच्यामध्ये आहे.

**रिटा शाह :-**

अध्यक्ष साहेब, मी अजुनही बोलते की, मला कुठली माहिती नाही पाहिजे. आपण स्वतः रुलिंग दिले आहे की, सभा संपल्यानंतर सर्व सभासदांना माझ्या एकटीचा हक्क नाही. सर्व सभासदांचा तो हक्क आहे. पण मी स्वतः मागितले आहे आणि ते मी पत्राच्या हिशोबाने आपण बघितले असेल की, मी किती खेपा काढल्या आहेत. ह्या रिपोर्टसाठी आणि तो मिळत नाही. मला रिपोर्ट पाहिजे की, कुठली माहिती नाही पाहिजे. तो रिपोर्ट खरा आहे किंवा खोटा आहे. ती नंतरची गोष्ट आहे. पण त्या रिपोर्टची कॉपी पाहिजे आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कुठल्या कॅबिन आणि कुठल्या विभागामध्ये आहे तो माझा प्रश्न नाही. मला त्या रिपोर्टची कॉपी पाहिजे, नाही मिळाली तर मी माझ्या पत्राच्या अनुसार सोमवारी ०७/०३/२००५ ला उपोषणाला बाहेर बसणार.

**मा. सभापती :-**

या पत्राबाबत मी अशी रुलिंग देऊ इच्छितो की, सन्मा. सदस्यांनी हे पत्र सभेमध्ये दिलेले आहे आणि त्या पत्राचे वाचन झालेले आहे आणि त्याप्रमाणे त्यांनी आपल्याला सोमवार पर्यंतची वेळ दिलेली आहे. तोपर्यंत आपण त्यांना जो हवा तो रिपोर्ट सादर करावा. अन्यथा त्यांची जी कार्यवाही होणार आहे. त्याला आपल्या सर्वांना सामोरे जावे लागेल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

सादर करा. पण तो रिपोर्ट आमच्याकडे नाही तर आम्ही ते कसे सादर करणार.

**मा. सभापती :-**

मग हे पत्र चुकीचे आहे का?

**रिटा शाह :-**

रिपोर्ट कोणाकडे आहे, तो आमचा नाही तर प्रशासनाचा भाग आहे. ते तुम्ही शोधा, कुठे आहे ते. सापडत नसेल तर तुम्ही पोलीस एन.सी. लाँच करा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या ह्यांनी मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, सचिव, मुख्य पोलिस निरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका ह्यांना त्यांनी कॉपी दिलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, रणखांब साहेब म्हणतात की, त्यांच्याकडे कॉपी नाही, त्यांच्याकडुन ती पुढे कुठेतरी गेली असेल.

**मा. सभापती :-**

आपण हे प्रशासनाकडे म्हणजे आयुक्त साहेबांकडुन मागितले आहे आणि त्यांना ती वेळ दिलेली आहे. त्यांच्या अवधीमध्ये त्यांनी दिले तर ठिक आहे, नाही दिल्यानंतर त्यांची जी कार्यवाही होईल. त्याला आपल्या सर्वांना सामोरे जावे लागणार आहे.

**प्रभात पाटील :-**

त्या बसल्या म्हणजे आपण सगळे बसलो काय!

**गजानन भोईर :-**

हे एकाने मागितले नाही. त्या बसल्या म्हणजे सगळ्यांना बसावे लागेल.

**प्रभात पाटील :-**

आपल्यातील एक सदस्य असा धरणा धरेपर्यंत त्याच्यावर जर अशी परिस्थिती येत असेल म्हणजे.

**सुर्यकांत भोईर :-**

हा लाजीरवाणा प्रकार होऊन जाईल.

**प्रभात पाटील :-**

आपण तो रिपोर्ट ऐकलेला आहे, वाचलेला आहे. ते आपल्या सगळ्यांच्या कानावर आहे आणि ते गायब होतात कसे?

**मा. सभापती :-**

रिपोर्टचा प्रश्न आला व त्याचे वाचन झाले असेल तर ते प्रोसिडिंगमध्ये असेल.

**प्रभात पाटील :-**

यात प्रश्नच नाही. वाचन झाले आहे.

**मा. सभापती :-**

मला असे बोलायचे आहे की, तुम्ही तो रिपोर्ट प्रोसिडिंग द्वारे करुन घेऊ शकता. पेपर वाचन झाले असेल. ते टेपिंगमध्ये आले असेल, त्याद्वारे मिळु शकते.

**अशोक पाटील :-**

प्रोसिडिंगमध्ये आले नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

त्याच्यामध्ये झोन क्र. १ चे वाचन झाले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रत्येक वार्ड व्हाईज जे निरीक्षक गेले होते. त्यांच्याकडुन तुम्ही मागवुन घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

रिपोर्ट मागवुन ते सदस्यांना देणार होते. पण ते रिपोर्ट आलेच नाही.

**रिटा शाह :-**

विषय डायव्हर्ट करु नका. प्रभाग अधिकाऱ्यांनी काय केले, मुख्यालयाने काय केले, बावस्कर साहेबांनी काय केले, मी काय केले, तुम्ही काय केले, मी त्याबद्दल बोलत नाही. स्थायी समिती सभेपुढे आपण जो विषय उपस्थित केला होता तेव्हा तुम्ही त्या रिपोर्टची फाईल आणली होती आणि वॉर्ड व्हाईज, प्रभाग व्हाईज तुम्ही वाचन करणार होते आणि आपण ते वाचन सुद्धा केले. त्याच्यामध्ये लिहिले आणि तुम्ही प्रोसिडिंगची कॉपी उघडुन बघा, त्याच्यामध्ये बघा की, अमुक अमुक आम्ही वाचन केले. संपुर्ण सविस्तर माहिती तुम्ही त्याच्यामध्ये दिली नाही. वाचन केले असे तुम्ही त्याच्यामध्ये वाक्य

टाकलेले आहे. ते वाचन केलेल्या रिपोर्टची कॉपी मला पाहिजे आणि तुम्ही रुलिंग दिले होते की, सभा संपल्यानंतर तुम्हाला ते मिळणार आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़ो.) :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, जेव्हा या पत्रामध्ये उल्लेख केला की, जेव्हा या पत्रामध्ये उल्लेख केला की, जेव्हा सौ. विजया बेलवटे (लिपीक), आरोग्य विभाग व श्री. कांबळे, श्री. शिंदे ह्यांनी मला लिखित पत्र दिले आहे की, ते आमच्याकडे दिलेले आहे. तरी तुम्ही परत ते आमच्याकडे कसे मागता.

**रिटा शाह :-**

मी तुमच्याकडे मागत नाही, मी प्रशासनाकडे मागत आहे. मी रणखांब ह्यांच्याकडे मागत नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़ो.) :-**

याबाबत त्यांनी तुमच्याकडे पत्र दिले आहे.

**रिटा शाह :-**

काय झाले आहे त्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे स्पष्टपणे लिहिले आहे. ते तुम्हालाही दिसुन येईल की, काय-काय केले आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़ो.) :-**

शेवटच्या परिच्छेदात तुम्ही स्पष्ट बोललात की, ज्यावेळेस तुम्ही ते दिले ते त्यांनी मान्य केले आहे. त्यांच्या समक्ष श्री. कांबळे व श्री. शिंदे ह्यांनी लेखी दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

बावस्कर साहेब, स्वतः माझ्याबरोबर तुमच्या समोर आले होते, ते बोलले मला मिळाले नाही. तुम्ही सांगितले की पाठवले. तुम्ही लेखी पुरावा दिलेला आहे की, तुम्ही ते पाठवले आहे.

**प्रभात पाटील :-**

रणखांब साहेब, मी असे म्हणेन की, श्री. कांबळे आणि शिंदे पण तुम्ही रणखांब साहेब, उपायुक्त, मुख्यालय आहात तुम्ही त्यांना हे विचारु शकता? तुम्ही असे म्हटले आहे तर रिपोर्ट कुठे गेले?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़ो.) :-**

संबंधित नगरसेवकांना, सन्मा. स्थायी समितीच्या सदस्यांना लेखी दिले असल्यानंतर त्याच्यात विचारणा करायचे कुठे येते? लेखी दिलेले पत्र त्यांच्याकडे आहे की, त्यांना हे पत्र प्राप्त झाले.

**रिटा शाह :-**

मला बावस्कर साहेब स्वतः आणि कांबळे व शिंदे ह्यांनी स्वतः मला लिहुन दिले आहे. बावस्कर साहेबांनी मला लिहुन देताना असे लिहिले आहे की, माझ्याकडे प्रतची कॉपी आहे ती मी तुम्हाला आता दाखवते.

**मा. सभापती :-**

आपला जो विषय ठरावाच्या प्रकरणाबद्दल आपण बोललो, सन्मा. सदस्यांनी चर्चा केली. प्रभात मॅडमही बोलल्या सचिवजी ठराव आणि ठरावाच्या प्रती त्या आपल्याकडच्या, त्या आमच्याकडे येणार नाही कारण तुम्ही ते दिलेले आहेत. त्या प्रती आणि संबंधित अधिकारी यासाठी माझे पत्र घेऊन त्यांना तुम्ही निर्देश द्या की, ठरावाप्रमाणे जे जे संबंधित अधिकारी आहेत त्या सर्व अधिकाऱ्यांना ठरावाच्या प्रतीसहित येथे त्यांनी माहिती द्यावी आणि सविस्तर माहितीसाठी हा विषय मी पुढच्या सभेत घेण्याचे सांगत आहे.

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, ह्याच विषयात मला बोलायचे आहे, तुमचा पुढचा विषय येईल तेव्हा येईल. पण ०७/१२/२००४ च्या सभेमध्ये ११३ क्रमांकाचे प्रकरण बघा. मी का बोलते, कारण हा विषय येईपर्यंत त्याचे इम्प्लीमेन्टेशन झाले नाही पाहिजे. त्याबाबत असा निर्णय झाला होता की,

**प्र. सचिव :-**

त्याच्यावर निर्णय झाला नाही, तो तसाच विषय बाजुला ठेवला आहे.

**प्रभात पाटील :-**

पण तुम्ही त्याच्यामध्ये मंजुर असे लिहिले आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर झाला म्हणुन आपण बोलतो. याकरीता जे अधिकारी आहेत, ते सविस्तर माहिती देण्याकरीता समक्ष उभे राहतील व त्या त्या ठरावावर चर्चा होईल. का केला नाही? काय अडचण झाली? काय झाले? ह्याची सर्व विचारणा आपण करुन घ्यायची आहे.

**प्रकरण क्र. १५१ :-**

ठरावाची अंमलबजावणीबाबत चर्चा करणे.

**ठराव क्र. १६४ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५४ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १५४ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (पाणीपुरवठा विभाग)

**ठराव क्र. १६७ :-**

imara Baa[-Mdr mahanagarpailakocyaa paNaI purvaza ivaBaagaakrIta maa.Aayau@t yaanaI maMjaUrI idlaolyaa p`stavaaMcaa tpSaIla KalaIla p`maaNao Aaho.

| A.k` | kamaacao naava | AMdaijat r@kma | majaUr saMsqaocao naava |
|---|---|---|---|
| 1 | Baa[-Mdr pUva- navaGar yaoqaIla jaimanaIvarIla jalakuMBaakrIta maatI Barava krNao. | ४,९०,८९१/- | Baaolaonaaqa majaUr kamagaar sahkarI saMsqaa ma.]lhasanagar |

id.3.11.2004 raojaIcyaa dO.saurjap`kaSa va dI f`I p`osa jarnala yaa vaR<ap~aMmaQyao p`isaw krNyaat Aalaolyaa jaaihr inaivada saucanaonausaar KalaIla kamaakrIta zokodaranao dr saadr kolaolao Aaho.

| A.Ë | kamaacao naava | AMdaijat r@kma | zokodaracao naava | dr |
|---|---|---|---|---|
| 1 | Aismata pak- yaoqaIla pMpIMga maSaInarI zoka pwtInao caalaivaNao | ७,७७,९९६/- | mao.A^ka^D-maako-TIMga A^nD saivh-saosa | 0.4% kmaI dranao |
| | | | mao.EaRtI [laoi@T/kla isasTIma | 4% jaada dranao |
| | | | mao.e.esa\.[I aoi@T/k kapao-roSana | 6% jaada dranao |

]prao@t inaivadaMpOkI mao.A^ka^D- maako-TIMga A^nD saivh-saosa yaaMcaI inaivada savaa-t kmaI dracaI AsaUna vaajavaI va rast Asalyaanao maMjaur krNyaat AalaolaI Aaho.

id. 27.07.2004 raojaIcyaa jaahIr drp~k saucanaonausaar imara Baa[-Mdr mahnagaarpailaka hd\dItIla baaoArvaola du$stIcyaa kamaakrIta KalaIla drp~kdaraMnaI dr saadr kolaolao Aaho.%yaacaa tpSaIla KalaIla p`maaNao Aaho.

**baaoArvaola du$stIsaazI baaoArvaola spoAr paT-sa\ (saaih%ya) dracaa tpiSala**

| baabak`. | saaih%yaacaa tpiSala | pirmaaNa | dr | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ikrNa bal.jaa Qava | pd\maavatI [MTrp`ayajaosa | sa^na [Mija.kM. |
| 1 | isalaoMDr | p`it naga | 2165.00 | 2,500.00 | 2,700.00 |
| 2 | caona hoDsah | p`it naga | 230.00 | 300.00 | 330.00 |
| 3 | e@sala | p`it naga | 240.00 | 290.00 | 300.00 |
| 4 | knao@ToD ra^D (12 ema.ema.x10’jaI.Aaya. ra^D) | p`it naga | 170.00 | 200.00 | 210.00 |
| 5 | h^nDla | p`it naga | 1,330.00 | 1,400.00 | 1,500.00 |
| 6 | h^nD pMp Ta^p AsaoMblaI | p`it naga | 1,640.00 | 1,700.00 | 2,000.00 |
| 7 | isalaoMDr maQaIla vaa^Sar | p`it naga | 40.00 | 60.00 | 80.00 |
| 8 | isalaoMDr APpr vha^lva | p`it naga | 640.00 | 700.00 | 800.00 |
| 9 | isalaoMDr laaoAr vha^lva | p`it naga | 615.00 | 700.00 | 800.00 |
| 10 | jaI.Aaya.pa[-p 2 1/2" x 10’ | p`it naga | 980.00 | 1,000.00 | 1,200.00 |
| 11 | e@sala baaoArIMga | p`it naga | 230.00 | 250.00 | 270.00 |
| 12 | baa^DI nailaka | p`it naga | 815.00 | 850.00 | 860.00 |
| 13 | kPlaIMga sah caona | p`it naga | 200.00 | 220.00 | 250.00 |
| 14 | vaa^Tr T^k AsaoMblaI | p`it naga | 680.00 | 700.00 | 750.00 |
| 15 | isalaoMDr AsaoMblaI | p`it | 1,940.0 | 2,000.0 | 2,300.00 |

| ba ab a k`. | saaih%yaacaa tpiSala | pirm aaNa | dr | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ikrNa bal.jaa Qava | pd\ma avatI [MTrp` ayajao sa | sa^na [Mija.kM . |
| | | naga | 0 | 0 | |
| 16 | irDyausar k^p | p`it naga | 80.00 | 90.00 | 100.00 |
| 17 | isalaoMDr baa^DI (ba`asa) | p`it naga | 840.00 | 900.00 | 1070.00 |
| 18 | APpr vha^lva saIT | p`it naga | 45.00 | 50.00 | 70.00 |
| 19 | APpr vha^lva gaaD- | p`it naga | 180.00 | 200.00 | 290.00 |
| 20 | pMp bakoT | p`it naga | 40.00 | 60.00 | 100.00 |
| 21 | rbar saIT irTonar | p`it naga | 35.00 | 70.00 | 150.00 |
| 22 | caok vha^lva | p`it naga | 90.00 | 100.00 | 125.00 |
| 23 | isalaIMga irMga | p`it naga | 45.00 | 60.00 | 70.00 |
| 24 | naT baaolT | p`it naga | 60.00 | 80.00 | 90.00 |
| 25 | baoAirMga | pit naga | 340.00 | 380.00 | 390.00 |
| 26 | isalaoMDrmaQalla jal.Aaya ra^D kPlaIMga | pit naga | 40.00 | 60.00 | 70.00 |
| 27 | hoD AsaoMblaI fa^r qaD- PlaoT | p`it naga | 340.00 | 400.00 | 420.00 |
| 28 | f`MT kvhr | p`it naga | 190.00 | 220.00 | 230.00 |
| 29 | qaD- PlaoT | p`it naga | 340.00 | 360.00 | 350.00 |
| 30 | ToilaskaoipMksT^nD AsaoMblaI puNa- baa^DI | p`it naga | 2,650.00 | 2,700.00 | 2,675.00 |
| 31 | spoAr (ema.esa.far h^MDla AsaoMblaI) | p`it naga | 2,160.00 | 2,200.00 | 2,175.00 |

**baaoArvaola du$stIsaazI purivalaolao saaih%ya vaap$na du$stI krNao. laobar caaja- (majaurI)**

| A.k | saaih%yaacaa tpiSala | pirma | majaurI dr |
|---|---|---|---|

| ` | | aNa | ikrNa bal.jaa Qava | pd\maa vatI [MTrp`a yajaosa | sa^na [Mija. kM. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | hatpMp caona ifTIMga laobar caaja- | p`it naga | 490.00 | 500.00 | 500.00 |
| 2. | hatpMp e@sala ifTIMga laobar caaja- | p`it naga | 470.00 | 500.00 | 490.00 |
| 3. | hatpMp baoAirMga (2 naga) ifTIMga laobar caaja- | p`it naga | 540.00 | 600.00 | 570.00 |
| 4. | hatpMp e@sala baoAirMga caona hoD ifTIMga laobar caaja- | p`it naga | 815.00 | 1000.00 | 900.00 |
| 5. | hatpMp h^nDla hoD ifTIMga laobar caaja- | p`it naga | 945.00 | 1000.00 | 960.00 |
| 6. | hatpMp h^nDla AsaoMmbalaI ifTIMga caaja- | p`it naga | 1,360.0 0 | 1500.00 | 1400.0 0 |
| 7. | hatpMp vaa^Tr hoD ifTIMga laobar caaja- | p`it naga | 1,055.0 0 | 1200.00 | 1100.0 0 |
| 8. | hatpMp baa^DI naTbaaolD (12 naga) ifTIMga laobar caaja- | p`it naga | 450.00 | 600.00 | 500.00 |
| 9. | hatpMp sauvaNa- baa^DI ifTIMga laobar caaja- | p`it naga | 975.00 | 1100.00 | 1000.0 0 |
| 10. | hatpMp pa[-p (21/2 x 10) ifTIMga caaja- | p`it naga | 1,800.0 0 | 2000.00 | 1900.0 0 |
| 11. | hatpMp jaI.Aaya.ra^D ifTIMga laobar caaja- (10naga pya-Mt) | p`it naga | 1,740.0 0 | 1800.00 | 1800.0 0 |
| 12. | hatpMp jaI.Aaya.ra^D kMpilaMga ifTIMga laobar caaja- | p`it naga | 1,840.0 0 | 1900.00 | 1900.0 0 |
| 13. | hatpMp isalaoMDr ifTIMga laobar caaja- | p`it naga | 2,400.0 0 | 2400.00 | 2500.0 0 |
| 14. | hatpMp isalaoMDr bakoT vaayasar ifTIMga laobar caaja- | p`it naga | 1,900.0 0 | 2100.00 | 2000.0 0 |
| 15. | hatpMp isalaoMDr bakoT Appr vaa^lva (ba`asa) sahIt ifTIMga laobar caaja- | p`it naga | 2,005.0 0 | 2100.00 | 2100.0 0 |
| 16. | hatpMp isalaoMDr bakoT laaoAr vaa^lva (ba`asa) sahIt ifTIMga laobar caaja- | p`it naga | 2,050.0 0 | 2090.00 | 2075.0 0 |
| 17. | hatpMp isalaoMDr AsaoMmbalaI ifTIMga laobar caaja- | p`it naga | 2,410.0 0 | 2650.00 | 2600.0 0 |
| 18. | hatpMp isalaoMDr ra^D | p`it | 2,120.0 | 2250.00 | 2200.0 |

| A.k` | saaih%yaacaa tpiSala | pirmaaNa | majaurI dr | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ikrNa bal.jaaQava | pd\maavatI [MTrp`a yajaosa | sa^na [Mija. kM. |
| | AsaoMmbalaI ifTIMga laobar caaja- | naga | 0 | | 0 |
| 19. | hatpMp baa^DI nailaka ifTIMga laobar caaja- | p`it naga | 3,140.00 | 3250.00 | 3240.00 |
| 20. | kupnailaka FlaaoirMga krNao. | p`it naga | 2,900.00 | 3100.00 | 3000.00 |
| 21. | hatpMp puNa- ifTIMga sah Pla^Tfama- (k+asah) tyaar krNao. | p`it naga | 3,600.00 | 4000.00 | 3900.00 |
| 22. | hatpMp Pla^Tfama- (k+a) tyaar krNaosaazI laobar caaja-. | p`it naga | 3,200.00 | 3500.00 | 3400.00 |

]prao@t baaoArvaola du$stIcyaa spoAr paT-sa\ (saaih%ya) dracaa va laobar caaja- (majaurI) dracaa tulanaa<mak t@ta pahta **mao. ikrNa bal. jaaQava** yaaMcao dr savaa-t kmaI va vaajavaI Aahot. ]prao@t drp~kaMpOkI **mao. ikrNa bal. jaaQava** yaaMcao drp~k savaa-t kmaI dracao AsaUna vaajavaI va rast Asalyaanao maMjaur krNyaat Aalaolao Aaho.

sababa ]prao@t p`stavaaMcao maa. sqaayaI saimatInao Avalaaokna kolaolao Aaho.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. अनंत रा. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५५ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १५५ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे खाडी लगत असून शहराचा बराचसा भाग सखल भागामध्ये वसलेला आहे. त्यामुळे पावसाळ्या दरम्यान पावसाचे पाणी शहराती सखल भागामध्ये साचून मोठ्या प्रमाणावर डबकी निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे शहरामध्ये विकासकर्त्यामार्फत मोठ्या प्रमाणावर इमारती / गृहसंकुलने / नागरी वसाहती निर्माण करण्याची कामे मोठ्या प्रमाणावर सुरु असून याकामी मोठ्या प्रमाणावर माती भराव होत असल्याने नैसर्गिक पाणी प्रवाह बंद होत आहे व ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचून डबकी तयार होतात. सदर डबक्यांमार्फत मोठ्या प्रमाणावर डास उत्पत्ती होत असते. सदरची डास उत्पत्ती शोधून त्यावर अळी नाशके वापरुन डासांची अळी नष्ट करणे गरजेचे आहे.

वारंवार एकाच प्रकारचे डास अळी नाशक वापरल्यास अळी नाशका विरुध्द मोठ्या प्रमाणावर प्रतिरोध आढळून येतो. करीता डासांच्या अळी नष्ट करुन नियंत्रण करणे कामी एका पेक्षा जास्त अळी नाशके वापरणे गरजेचे आहे. सदर अळी नाशकांपैकी एम.एल.ओ. हे अळी नाशक मोठ्या प्रमाणात उपयुक्त आहे. एम.एल.ओ ह्या अळी नाशकाची मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ही उत्पादीत कंपनी आहे. सदर कंपनीने कोणताही अधिकृत विक्रेता अथवा एजंट नेमलेला नाही. करीता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ह्या मुळ उत्पादीत कंपनीकडून मा. आयुक्त यांची मंजूरी घेऊन दरपत्रक मागवून २०,००० लीटर एम.एल.ओ. ऑईल मे. इंडियन ऑईल यांचेकडून खरेदी करण्यात आले आहे. सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

| **अळीनाशकाचे नाव** | **दर** | **एकुण परिमाण** | **रुपये** |
|---|---|---|---|
| एम.एल.ओ | रु. ३१,७६८/- प्रति १००० लिटर करीता | २०,००० लीटर | रु. ६,४४,८७८/- |

सदर प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ ग. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५६ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १५६ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १६९ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता लागणारे किटक नाशक/जंतूनाशक खरेदी कामी दि. ०१/०१/२००५ रोजीच्या दै. वार्ताहार, दै. सागर या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन दि. ११/०१/२००५ रोजी मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त झालेल्या निविदामधील दराचा तपशिल खालीलप्रमाणे

| **क्र.** | **किटक नाशकाचे नाव** | **मे. श्रीराम ॲग्रो एजन्सी** | **मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन** | **मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन** |
|---|---|---|---|---|
| १ | Fenthion 82.5% EC | रु. १६६५/- प्रती लिटर | रु. १६०५/- प्रती लिटर | रु. १६४९/- प्रती लिटर |
| २ | Neemtex 300 PPM | रु. ५१०/- प्रती लिटर | रु. ४८९/- प्रती लिटर | रु. ४८३/- प्रती लिटर |
| ३ | Malathion 5% D.P | रु. २०.५० प्रती किलो | रु. २१.४८ प्रती किलो | रु. १९.५६ प्रती किलो |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता फेन्थीऑन ८२.५ टक्के इ.सी. हे अळी नाशक पुरवठा करणे कामी मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन यांची रु. १६०५/- प्रति लिटर कमी दराची निविदा दोन निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दराची आहे. निमटेक्स ३०० पी.पी.एम या अळी नाशक पुरवठा करणेकामी व मॅलेथीऑन ५ टक्के डी.पी हे जंतू नाशक पुरवठा कामी मे.डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन यांची अनुक्रमे रु. ४८३/- प्रती लिटर व रु. १९.५६ प्रती किलो कमी दराची निविदा दोन निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दराची आहे.

वरील सर्व किटक नाशके / जंतूनाशके खरेदी करणे करीता रु. ९,८१,३००/- खर्च अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे अळी नाशके / किटक नाशके खरेदी करण्याच्या प्रस्तावास मा. आयुक्त सोा., यांनी मंजूरी दिलेली आहे.

सदर प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ ग. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५७ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १५७ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १७० :-**

महानगरपालिकेच्या लॅडफिल साईटवरील आगामी दोन ते तीन महिन्यासाठी दैनंदिन कचऱ्याचे ढीग सपाटीकरण करण्यासाठी भाड्याने चेन डोझर पुरवठा करणे कामाची जाहिर निविदा सूचना दि. ०१ जानेवारी २००५ रोजीच्या दै. वार्ताहर, दै. सागर या वृत्तपत्रात प्रसिध्दी करुन दि. ११/०१/२००५ रोजी मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या असता मुदतीत प्राप्त झालेल्या निविदामधील दरांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| क्र. | निविदाकाराचे नाव | मशिनचा प्रकार | दर (प्रती तास प्रती मशिन) |
|---|---|---|---|
| १ | मे. श्री ट्रेडर्स | चेन डोझर | रु. ७५०/- |
| २ | मे. साई कन्स्ट्रक्शन | चेन डोझर | रु. ८२५/- |
| ३ | मे. व्ही.पी. अहिरे | चेन डोझर | रु. ८००/- |

वरील प्रमाणे महापालिकेच्या लॅडफिल साईट वरील कचरा सपाटीकरण करणे कामी भाड्याने चेन डोझर पुरवठा कामी सादर केलेले दर हे प्रतीतास प्रती मशिन असे असून या कामी मे. श्री ट्रेडर्स यांनी सादर केलेले दर रु. ७५०/- प्रती तास प्रती मशिन हा दर सर्वात कमी आहे. सदरचा दर मागिल वर्षी पुरवठा केलेल्या ठेकेदाराने सादर केलेल्या दरा पेक्षा जास्त आहे. दर कमी करण्यासंबंधी वाटाघाटी करणे कामी मे. श्री ट्रेडर्स यांना बोलाविले असता त्यांनी लॅडफिल साईट वरील कचरा सपाटीकरण करणे कामी भाड्याने चेन डोझर पुरवठा कामी सन २००३-०४ या वर्षातील मंजूर दरानुसार म्हणजेच रु. ७००/- प्रती तास प्रती मशिन या दराने पुरवठा करण्याचे लेखी पत्रान्वये मान्य केलेले आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या लॅडफील साईट वरील ३ महिने दैनंदिन कचरा सपाटीकरण करणे कामी अंदाजे रु. ९,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. कचरा सपाटीकरण करणे कामी भाड्याने चेन डोझर पुरवठा करणे कामाची रु. ७००/- प्रती मशिन प्रती तास कमी दराची निविदा स्विकारणेस मा. आयुक्त सोा., यांनी मंजूरी दिलेली आहे.

सदर प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ ग. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रिटा शाह :-**

साहेब, अवलोकनाचा विषय आहे. या विषयावर मला बोलायचे आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आपल्याला अवलोकनाच्या विषयावर चर्चा करता येणार नाही.

**रिटा शाह :-**

मला चर्चा करायची नाही. पण विचारण्याचा अधिकार मला आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

हा अवलोकनाचा विषय आहे. याच्यावर आपल्याला चर्चा करता येणार नाही पण जी आवश्यक माहिती पाहिजे. ती माहिती आपल्याला मिळेल.

**मा. सभापती :-**

या विषयावर तुम्हाला जी काही चर्चा करायची आहे. ती माझ्याबरोबर करा.

**रिटा शाह :-**

मला चर्चा करायची नाही. मला फक्त विचारायचे आहे. मला विचारण्याचा अधिकार नाही आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

हे जे किटकनाशके मागविली जातात. ते ०१/११/२००४ ला मागविली आहेत. नंतर तिच किटकनाशके २९/०१/२००५ ला मागविली आहेत आणि आता परत मागवता म्हणजे प्रत्येक महिन्याला मागवता तर ते मच्छर जाते कुठे?

**मा. सभापती :-**

आपले म्हणणे बरोबर आहे अणि हे आयुक्त साहेबांनी आपल्या माहितीसाठी पाठविलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही प्रत्येक महिन्याला जर नऊ नऊ, दहा दहा लाखाची जर औषधे मागवत असाल, तर महापालिकेचा पैसा हा फुकट येतो का? हा जनतेचा पैसा आहे.

**मा. सभापती :-**

बरोबर आहे, हे आयुक्त साहेबांनी आपल्याकडे पाठविले आहे. याबाबतची माहिती जर आपल्याला हवी असेल तर आपण याबाबत आयुक्त साहेबांकडुन खुलासा करुन घ्यावा.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, हे जे अवलोकनाचे विषय आपल्या समोर येतात. आयुक्त साहेब, त्यांच्या अधिकारात ते करतात. निविदा काढुन करतात. याबाबत आपण मला अशी माहिती द्या की, ह्या वर्षीचा पुर्ण बजेट जवळ जवळ संपत आला आहे. या पुर्ण बजेटमध्ये अवलोकनार्थाच्या नावाखाली किती बजेट वापरण्यांत आलेला आहे. मी याबाबत लेखी खुलासा देतो, त्याचे आपण उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

ठिक आहे.

**रिटा शाह :-**

मला श्री. शिंदे व कांबळे साहेबांनी पत्र दिले आहे. बावस्कर साहेबांनीही दिले आहे, ते मी अध्यक्ष महोदयांना वाचन करण्यासाठी देते.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी, सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांना श्री. शिंदे व कांबळे ह्यांनी दिलेल्या पत्राचे सभागृहात वाचन केले.)

**रिटा शाह :-**

डॉ. बावस्कर ह्यांनी मला पत्र दिले होते. त्या पत्राचे मी वाचन करत आहे.

(सन्मा. सदस्या श्रीम. रिटा शाह ह्यांनी डॉ. बावस्कर साहेबांनी दिलेल्या पत्राचे सभागृहात वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

आरोग्य अधिका-यांनी तसा खुलासा दिला होता की, प्रत आम्हाला मिळालेली आहे आणि तुम्हाला तसे लेखी दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रणखांब साहेब बोलतात की, मी पाठवुन दिले त्यांच्याकडे पोच पावती आहे. बावस्कर साहेबांकडे गेली तर ते म्हणतात की, मी प्रत मागितली होती आणि प्रत माझ्या टेबलापर्यंत पोहोचलेली नाही, असे ते सांगतात. तर मी त्यांना असे सांगितले की, तुम्ही ही गोष्ट त्यांच्यासमोर येऊन सांगा. त्यांनी लेखी दिले आणि त्यांच्या समोर येऊनही ते बोलले आहे की, मला एकही प्रत मिळाली नाही. तेव्हा रणखांब साहेबांनी त्यांची पुस्तकी जी नोंदवही असते त्याच्यामध्ये मला

दाखवले की, ओरिजनल आणि त्या बाईलाही समोर उभे केले.  जेवढे ओरिजनल पेपर होते, तेवढे सर्व आरोग्य विभागाकडे पाठवुन दिले.  त्याची पोच पावती आमच्याकडे आहे.

**अशोक पाटील :-**

तसे तुम्हाला श्री. शिंदे व कांबळे ह्यांनी लेखी दिलेले आहे ना!  ते वाचून दाखविले आहे आणि त्यांनी ते बघितल्याशिवाय का, लेखी दिले.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटील साहेब, महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आरोग्य विभागाचा गोपनीय अहवाल हा कुठल्या कॅबिनमध्ये आणि कुठल्या साहेबाकडे ही महत्त्वाची गोष्ट माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी नाही, माझी फक्त मागणी अशी की, त्या रिपोर्टची प्रत मला मिळायला पाहिजे, नाही मिळाली तर मी धरणा धरणार आहे. ते कुठुन शोधायचे काम त्यांचे आहे, आपले काम नाही ते कुठे आहे बघायचे.

**अशोक पाटील :-**

तो तर प्रशासनाचाच भाग आहे. साहेब, तुम्ही त्याच्यावर काही तरी निर्णय घ्या. तुमच्या अधिकाऱ्यांना आदेश द्या. तुमच्या अधिकारात.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी त्यांना त्याच्यावर काय आदेश देणार.  सगळ्या प्रकारे डिस्कशन झालेला आहे, तर मी त्याच्यामध्ये कुठला आदेश देणार?  ऑलरेडी हॅन्ड ओव्हर केले आहे.  त्यांच्या दोन्ही एस.आय. ने मान्य केले की, आमच्याकडे प्राप्त झाले आहे, लेखी दिलेले आहे.  अननेसेसरी या प्रकरणात मला घसेटु नका.

**हॅरल बोर्जिस :-**

वास्तविक उपायुक्त साहेब, ज्यावेळेला सन्मा. सभापती ह्या सभेला उपस्थित होते, त्यांच्या वक्तव्यामध्ये ही नोट आलेली आहे, टेपिंगमध्ये सुद्धा असेल की, सभा संपल्यानंतर सन्मा. सर्व सदस्यांना त्या अहवालाची प्रत देण्यांत यावी. असे सभापती साहेबांचे रुलिंग होते. सभापती जर अशा पद्धतीचे रुलिंग देत असतील व त्याचे जर इम्प्लीमेन्टेशन होत नसेल तर अशा पद्धतीचे वक्तव्य करण्यामध्येच काही अर्थ नाही.

**रिटा शाह :-**

इम्प्लीमेन्टेशनचा भाग वेगळा आहे.

**अशोक पाटील :-**

याचा अर्थ की, आरोग्य विभाग तो अहवाल दडपण्याचा प्रयत्न करतोय. हे असे सिद्ध होत आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

जरी त्यांनी तो अहवाल दडपण्याचा प्रयत्न केला, तरी महापालिकेच्या, नगरपालिकेच्या सर्व कामकाजाच्या पद्धतीमध्ये तुम्ही-आम्हा सर्वांना ज्ञात आहे की, एखादा अधिकारी जर एखाद्या पद्धतीने प्रशासनाला रिपोर्ट किंवा त्याच्या संबंधित वरिष्ठांना अधिकाऱ्याला सादर करत असेल तर तो अधिकारी त्याची नक्कीच प्रत स्वतःकडे ठेवत असेल याचा अर्थ ज्या ज्या झोनचे अधिकारी होते.  त्या सर्व झोनच्या अधिकाऱ्याकडे ते रिपोर्ट असायला पाहिजे आणि जर नसतील तर ते सर्व संबंधित अधिकारी त्या कार्यवाहीला पात्र ठरतील.

**रिटा शाह :-**

आपले रुलिंग मला मान्य आहे. आपल्या सर्वांकडे त्याची प्रत असते.  आज अशी गोष्ट आहे की, तो गोपनीय अहवाल होता आणि स्थायी समितीपुढे तो आला होता आणि तो टेबलावरुन की तुमच्या ड्रॉव्हरमधुन किंवा तुमच्या तिजोरीमधुन चोरी झाली ही महत्त्वाची गोष्ट नाही.  तुम्ही पहिले त्याची पोलिस एन.सी. लॉच करा.  अशी माझी त्याच्यावर मागणी आहे आणि मला तोच अहवाल पाहिजे, जो तुम्ही आमच्या समोर ठेवला आहे.  मी आता दुसरा आरोप लावणार.  जेव्हा माझी एवढी फसवणुक होते, मागे जे रणखांब साहेबांच्या अध्यक्षतेखाली जे काही झाले आणि जो अहवाल आपल्या समोर पुटअप झाला.  त्यानंतर मी असेही ऐकले होते की, त्यांच्या कॅबिनमध्ये बसुन त्यांनी हा रिपोर्ट बनवुन घेतला आहे असा आरोप त्यांच्यावर झालेला आहे.  हे शब्द मला स्थायी समितीमध्ये नाही बोलायला पाहिजे होते. पण आता प्रभाग अधिकाऱ्याकडे तीच कॉपी आहे, ते तुम्ही मला कसे सांगणार. मेन रिपोर्ट जो फाईलमध्ये ठेवली आहे. ती कॉपी तुमचीच आहे, हे तुम्ही मला असे सांगणार. त्याच्यावर त्यांनी त्याची तेव्हाची पोच पावती घेतली आहे का? त्याच्यावर जावक क्रमांक पडला आहे का? त्याच्यावरती तारीख काय? घरी बसवुन कोणीही बनवु शकतो. मागे आपला जो स्थायी समितीमध्ये

विषय झाला, त्याच्यावर असे स्टेटमेंट झालेले आहे. का तो रिपोर्ट खोटा होता का? एवढे प्रभाग अध्यक्ष, प्रभाग अधिकाऱ्यांनी दिलेले रिपोर्ट खोटे आहेत का? प्रभाग अधिकाऱ्याला विचारा. जेव्हा त्यांनी तो रिपोर्ट मुख्यालयाकडे सुपुर्द केले. तेव्हा मुख्यालयाकडुन त्यांनी जावक क्रमांक लिहुन पोच पावती घेतली आहे का, रिपोर्ट सादर करताना.

**अशोक पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही ह्याच्यामध्ये दिले आहे की, त्या अहवालाचे वाचन झालेले आहे. त्याच्या प्रती तुमच्याकडे उपलब्ध असायला पाहिजे.

**प्र. सचिव :-**

डायसवर ज्या प्रति होत्या, त्याच प्रति वाचल्या.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

असा खुलासा करतो की, हा विषय सभेसमोरचा नव्हता. त्यामुळे आपण पत्र दिले हे मान्य आहे आणि आपण जे पत्र दिले आहे त्याच्यावर तथायोग्य कार्यवाही होईल. परंतु, या विषयावर आता चर्चा करणे योग्य होणार नाही आणि मला तरी शक्य नाही चर्चा करणे. कारण बेसिकली जे काही आहे ते आपल्या समोर आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

उपायुक्त साहेब, ह्यामध्ये असे आहे की, सन्मा. सदस्यांनी आपल्याला स्पेसिफिक टाईम पिरीयड दिलेला आहे. त्या पिरियडमध्ये त्यांना जर अहवालाची प्रत मिळाली नाही. तर पुढच्या कार्यवाहीस प्रशासनाचे जे संबंधित अधिकारी असतील ते कार्यवाहीस पात्र ठरतील. त्यांनी त्यांचे काम केलेले आहे आणि पुढचे काम प्रशासनाला आता करायचे आहे.

**अशोक पाटील :-**

प्रशासन त्याचा त्यांना खुलासा देत नाही. मग त्यांनी त्यांची पुढची कार्यवाही करावी.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, पहिल्या सभेमध्ये साठ फुटीवर रोडवर गणेश मंदिरजवळ एक ऑफीस बांधले आहे. त्याबाबत चर्चा झाली असता श्री. मनाळे साहेबांनी सांगितले की, त्यांनी स्टे घेतला आहे. हा स्टे कुठपर्यंत घेतला आहे आणि अजुन पर्यंत ते कॅबीन तसेच आहे. स्टे आहे ते कुठपर्यंत आहे? कोर्टात केसचे काय झाले किंवा नाही?

**रिटा शाह :-**

मनाळे साहेबांनी खुलासा देण्याअगोदर मी, असे सांगू इच्छिते की, कारण अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण विभाग हा अतिमहत्त्वाचा विभाग आहे आणि आम्ही नगरसेवक त्यांच्याकडे तक्रार ही करतो आणि त्याच्यावर ते प्रॅक्टीकली काम करायला बघतात. त्यात महत्त्वाची गोष्ट की, त्यांना पोलीस बंदोबस्त केव्हाही मिळत नाही. तसेच, त्यांना हवी तेवढी सुरक्षा मिळत नाही. मागे एका तक्रारीवर मनाळे साहेब नया नगरला बांधकाम तोडायला गेले होते. तेव्हा भाड्याची लोक येऊन त्यांच्यावर जे आक्रमण होते. तेव्हा त्यांच्या स्वतःचे रक्षणाकरीता त्यांना पोलीस बंदोबस्त हा पाहिजे. ते तिथे डेरिंगने गेले आणि ते बांधकाम त्यांनी तोडले. पण ते बांधकाम तोडल्यानंतर त्यांना जी सुरक्षा मिळायला पाहिजे. ती सुरक्षा आपल्याकडुन मिळत नाही. त्यांना केव्हाही पोलीस बंदोबस्त मिळत नाही आणि जे गणेश मंदिरचा मुद्दा मॅडमनी उठवला आहे. तो मुद्दा मागे मी स्वतः सभेत उठवला होता. त्याच्यावर कर विभागाने खोटी टॅक्स आकारणी करुन दिलेली आहे. तो गाळा आता बनवला आहे आणि त्याला मागची आकारणी करुन दिलेली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. त्याच्यावर साहेब आपण स्वतः लक्ष घाला. आता ते ऑफिस बनले आहे आणि मागच्या वर्षाची त्याच्यावर आकारणी झालेली आहे. तो गाळा जो आहे तिथे आता ऑफिस झालेले आहे, तिथे कचराकुंडी होती.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, आयत्या वेळेच्या विषयाला सुरुवात करणे अगोदर मी आपल्याला विनंती करुन मागे जात आहे. आपण आता जो विषयपत्रिकेवरील विषय फेटाळला होता म्हणजे तो विषय पुढे घ्यायचे असे ठरले होते. त्याबाबत मला सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करायची आहे की, हा ह्या कर्मचाऱ्यांचा विषय आहे. तो बऱ्याच वेळा येऊन गेलेला आहे. परत तुम्ही याल. ह्या प्रशासनाकडे टिपणी मिळेल किंवा नाही हा दुसरा भाग आहे. आता विषय आलेला आहे. तर माझी सदस्यांना विनंती आहे की, तो विषय पुन्हा घेऊन त्याच्यात थोडेसे बदल करावा, ह्या आस्थापनेच्या विषयामध्ये जो पदोन्नतीचा विषय आहे, त्या विषयावर विचार करुन निर्णय घेणे असे करा आणि तो विषय चर्चेला घ्या.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, मी विचारलेल्या माझ्या प्रश्नाचे काय झाले?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय. मॅडम या प्रकरणी तेव्हा न्यायालयाने स्टेटस्को मेन्टेन करावा असा आदेश दिला होता. सद्य स्थितीत तारीख काय पडली आणि काय निकाल झाला ह्याची माहिती घेऊन सभा संपल्यानंतर तासाभरात मी आपल्याला माहिती देतो.

**कैलासबेन जानी :-**

आपण याचे उत्तर कधी देणार? आज पाच महिने झाले आणि त्यांनी स्टे कधी घेतला ह्याची तारीखही मला देत नाही.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

जी काही तारीख पडलेली आहे ते मी आपल्याला सभेनंतर तासाभरात माहिती देतो. हे विधी विभागाशी संबंधित भाग आहे. तरीही मी त्यांच्याकडून माहिती घेऊन आपणांला उत्तर देतो.

**रिटा शाह :-**

साहेब, विधी विभाग नंतर येतो. पण त्याच्यावर जो टॅक्स लागलेला आहे तो खोटा टॅक्स लागलेला आहे. तिथे कचराकुंडी होती आणि तो गाळा आता बनवला आहे. त्याच्यावर कर आकारणी करणारा जो माणुस आहे त्याला तुम्ही सस्पेंन्ड करा. तुम्ही त्याची चौकशी करा. मॅडमचे इलेक्शन होते तेव्हा तिथे गाळा नव्हता आणि तिथे आता गाळा झाला.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, १९९१ पासून तो माझा विभाग आहे आणि तिथे कचराकुंडी होती व तिथे लगेच आता ऑफीस झाले व त्याने टॅक्सही लावून घेतला. झोपडपट्टीच्या टॅक्समधून कुठली झोपडपट्टी उठवून आणली असेल आणि तो टॅक्स दाखवला व ट्रान्सफर करुन घेतले असे कोणी ते केले? आपला वकील तिथे जातो का नाही? आपला विधी सल्लागार जर एकही केस जिंकत नसेल तर त्यांना पैसे कशाला द्यायचे? महानगरपालिका त्यांना पैसे देते ना?

**गजानन भोईर :-**

ते केस जिंकत नाही ते तर जाऊ दे. पण एका शाळेवर फक्त प्राथमिक परवानगीवर पाच-पाच स्लॅब झाले आहेत. त्याचे उत्तर दोन्ही डिपार्टमेंट देऊ शकत नाही. ए.टी.पी. विभाग व अतिक्रमण विभाग असे दोन्हीही विभाग त्याचे उत्तर देत नाही. प्राथमिक परवानगी ह्याचा अर्थ काय? एन.ए. / एन.ओ.सी. ला पाठवलेले आहे. त्याच्यावर त्याने संपुर्ण पाच माळे होऊन प्लास्टर झालेले आहे आणि तिथे राहायला गेले आहेत. ती शाळा आहे आणि शाळा तोडाल्यानंतर त्याच्यावर जे.सी.बी. लावली आणि ती जे.सी.बी. लावल्यानंतर ती एक तासात बंद झाली. त्याचे उत्तर कोणीही आजपर्यंत दिलेले नाही. मी पत्र लिहून दिड महिना झाला आहे. आता मी कोर्टातही जातो आणि नगरविकासाला जातो. कारण त्याचे उत्तर अजुन कोणीही देत नाही. तीन दिवस अगोदर मी ए.टी.पी.ला परत पत्र लिहिले आहे की, ह्याची सविस्तर काय काय परवानगी दिलेली आहे? त्याचे मला तुम्ही पत्र द्यावे. तेही अजुन मला मिळाले नाही. एका पत्राला दिड महिना झाला देऊन, त्याचे उत्तर अजुन नाही. शेवटला आता आम्हांला पुढचे दरवाजे बघावे लागतील. जर दिड-दिड महिने उत्तर मिळत नसेल तर त्याबाबत सदस्यांना, आम्हांला विचार करावा लागेल.

**कैलासबेन जानी :-**

पाच माळा, सहावा माळा, सातवा माळा बनतो आणि तुम्हीच सांगता की, हे अनधिकृत आहे. तरीसुद्धा तिथे बांधतात आणि त्याचे मेन्टेनन्स चार्जसुद्धा वसुल करत नाही. अधिका-यांच्या हिशोबाने घेत नाही, ते ठिक आहे. पण ते एवढा पाचवा, सहावा, सातवा माळा बांधेपर्यंत तुम्ही काय करता?

**रिटा शाह :-**

साहेब, अति महत्वाची बाब आहे. मनाळे साहेब, माझ्याही दोन-तीन तक्रारी आहेत. नॅशनल गॅरेज दोन वर्षापुर्वीही त्याला तोडले होते. आपल्या हायवेवर सर्व अधिकारी येता-जाताना बघतात. अनधिकृतपणे तो ते गॅरेज चालवतो. तसेच, भाटीया ह्यांचीही मी तुम्हांला तक्रारी केली आहे. चार माळे मंजुर आहेत आणि त्याने सात माळ्याचे बांधकाम बिनधास्त केले आहे. त्या माणसाने महानगरपालिकेत येऊन असा शब्द बोलला की, आमची त्याच्यावर सेटींग झालेली आहे. म्हणजे असे एका नगरसेवकाला बोलतो की, काय करुन घेणार? आमची सेटींग झाली आहे. दुसरा मुद्दा असा की, निळकंठ हॉटेलच्या समोरचे सांगितले होते की, तिथे प्लॅन पास झालेला नाही. त्याने पुट-अपही केले नाही आणि तिथे बांधकाम चालू आहे. फक्त त्या जमिनीच्या स्टे वरुन. तुम्हांला स्टे दाखवतो

आणि तो स्टे तुम्ही मान्य करता. पण एकंदरीत मागच्या मॅटरवर तो स्टे आहे. आता जे बांधकाम चालू आहे त्याची कुठलीही कागदपत्र त्याच्याकडे नाहीत. हे सदर बांधकाम तुम्ही ताबडतोब तोडा अशी मी तुमच्याकडे मागणी करते.

**सुर्यकांत भोईर :-**

नाईट मिटींग आणि झंकार इंडस्ट्रीज ह्याचा स्टे कधी उठतो? ते आपण मला सांगा.

**कैलासबेन जानी :-**

तोंडाने सांगातात की, तोडायला जा. तर तोडायला जातात आणि लेखी दिले तर ते जात नाही.

**गजानन भोईर :-**

मी आपल्याकडे चर्चेला विषय आणतोय. खारीगांव हे मा. सभापती व मा. विरोधी पक्ष नेते ह्यांचे गांव. त्या गावामध्ये जुने मंदिर म्हणजे वर्षानुवर्षे पुर्वीचे आम्ही तेव्हा जन्मलो नव्हतो. म्हणजे मला पन्नास वर्षे झाली. तेव्हाचे ते मदिर छोटेसे बांधकाम होते. असे सांगतात की, एका नगरसेवकाच्या सांगण्यावरुन ते तोडण्यांत आले. एवढी क्विक आपली महानगरपालिका आहे. फक्त सांगण्यावरुन अनधिकृत बांधकाम तोडले जाते आणि ज्या गावात आता परिस्थिती मारामारीवर आलेली आहे त्याला जबाबदार कोण? याचा आपण मला खुलासा करा.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रसिद्धी माध्यमामध्ये कानसिंग नरावतचे नांव ऐकायला येते.

**गजानन भोईर :-**

तोंडाने सांगून एवढी कार्यवाही होते आणि मग लेखी कुठे गेले? लेखी स्वरुपात देतात त्याला काही किंमत नाही का? मग उद्यापासून आम्ही लेखी सांगायला सुरुवात करतो. जर अशी क्विक ॲक्शन होत असेल तर..........

**प्रेमनाथ पाटील :-**

तोंडाने सांगितल्यावर हे लोक नोटीस देणार आहेत का?

**गजानन भोईर :-**

कानसिंग सांगतो काय आणि कार्यवाही होते काय? कानसिंग बोलला असे मी एका शब्दाने ह्यांना बोललो नाही. फक्त ह्याच्यावर त्याने कुठल्या ह्याच्यासाठी दडपण आणले होते त्यासाठी उलट त्याच्यावर हे केले आहे.

**कैलासबेन जानी :-**

कोर्टात केस चालू आहे. त्यांचे आणि त्यांच्या मुलाचे.

**गजानन भोईर :-**

काही त्याचा संबंध नाही. कारण तो शपथ घेऊन बोलतोय की, मंदिर के पास अपना जिंदगी गया।

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईरजी, आपले सन्मा. सभापती त्या संबंधित ट्रस्टचे विश्वस्त आहेत. संबंधित विषयाबाबत त्यांनी नक्की त्यांच्या परीने या गोष्टीवर हालचाल केलेली असेल. आता सध्या ते येथे उपस्थित नाहीत.

**गजानन भोईर :-**

आम्हांलाही समजू दे ना की, नक्की विषय काय आहे?

**हॅरल बोर्जीस :-**

आम्ही सुद्धा त्याची माहिती घेतल्यानंतर तो विषय फार गंभीर झालेला आहे. सन्मा. सभापती साहेबांनी त्याच्यावर नक्की ॲक्शन घेतली असेल.

**गजानन भोईर :-**

विचारायचे एवढेच आहे की, आम्ही लेखी द्यावे की, ह्या पुढे तोंडी सांगावे हेच फक्त आपण आम्हांला सांगा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. सभापती साहेबांच्या वतीने सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपण सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.०० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**